संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 6 | Marathi Monthly | Thane, 1 December 2024 to 31 December - 2024 | Pages 16 | Price : 10/-

# ‘काळा-पैसा’ हाच महाराष्ट्राचा मुख्यमंत्री

''विजय कोणत्याही पक्षाचा नाही, व्यक्तिचा नाही, जनतेचाही नाही आणि धर्माचा तर नाहीच नाही...या सगळ्यांचाच दणदणीत पराभव करुन निवडणुकीत वाटलेल्या काळ्या पैशाने विजय मिळवलाय... आता, यापुढे ‘काळा-पैसा’ हाच महाराष्ट्राचा मुख्यमंत्री'', ही एक समाजमाध्यमातील मार्मिक प्रतिक्रिया वाचल्यानंतर....

''पैशाच्या महा(युती)पुरे झाडे जाती, तेथे ५१ लव्हाळे वाचती...!!!'' असाच, या महाराष्ट्र विधानसभा-निवडणूक निकालाचा ‘सातबारा’ मांडावा लागेल.



...यापेक्षा, महाराष्ट्र-विधानसभा निवडणूक-निकालाचं वेगळं वर्णन करायचंच झालं तर....

**''नवसे पुत्र होती। तरी का करावा लागे पती।।'' या तालावर, ‘ईव्हीएम कारणे विजयी होती, तरी का प्रचार करावा लागे निवडणुकीप्रती'', असं करावं लागेल, बस्स्!**

...पूर्वी ‘मटका’ लावला जायचा, आता EVM लावला जातो, एवढाच फरक.

**...लक्षात ठेवा, मतपेटीतून परिवर्तन होईलसं दिसेनासं झालं; तर, अखेरीस जनता स्वतःच्या हाती सूत्रं घेते आणि अराजकसदृश पार्श्वभूमी तयार होऊ लागते!**

...सत्ताधाऱ्यांच्या ‘स्टार-प्रचारकां’च्या सभेच्या खुर्च्या रिकाम्या, प्रचारादरम्यान यांना लोकं गावागावातून हाकलून देतात...तरी, महागाई-बेरोजगारी-अर्धरोजगारीचा आगडोंब उसळला असतानाही, निव्वळ ‘दिड हजारी’ भिकेपोटी, महाराष्ट्रीय जनता यांची एवढी भरभरुन मतांनी ‘ओटी’ भरेल, हे संभवत नाही...इतरे भाषिकांना (बहुशः गुजराथी-भाषिकांना) श्रीमंत करणारा शिवबा-संतांचा भोळसट महाराष्ट्र, कायम गरीब जरुर होता; पण, गुजराथसारखा ‘नीतिशून्य’ आणि यूपी-बिहारसारखा ‘अवलक्षणी-भिकारडा’ कधिच नव्हता... फक्त, तो तसा यापुढे होऊ नये म्हणून, खूपच मेहनतीने नजिकच्या भविष्यात डोळ्यात तेल घालून दक्षता घ्यावी लागेल.

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# थोडा विचार करा!

**आकडेवारी पहा. या राज्यातलं शेंबडं पोर पण सांगेल की, फार मोठी गडबड आहे. चार महिन्यात जनमत एवढं बदललं यावर कोण विश्वास ठेवणार?**

**निलेश राणे, संतोष बांगर, संजय राठोड, अब्दुल सत्तार निवडून येतात आणि पृथ्वीराज चव्हाण, नरसय्या आडम मास्तर, कोरोनात प्रचंड काम केलेले राजेश टोपे, यशोमती ठाकूर, सुनील देशमुख पडतात... इतका बदलला महाराष्ट्र?**

ही आकडेवारी प्रचंड संशयास्पद आहे. महाराष्ट्र एवढा ठार वेडा होऊ शकत नाही. आणि, हे निकाल जर खरे असतील तर, ते जास्त चिंताजनक आहे.

प्रचंड पैसे देऊन मतं विकत घेणे, गद्दारी करणे, पक्ष मोडणे, महाप्रचंड भ्रष्टाचार याला महाराष्ट्रानं राजमान्यता दिली, असा त्याचा अर्थ आहे.

**मोदींची २०१४ साली लाट होती तरी, त्यांना हे यश मिळवता आले नाही आणि आता तर अशी कोणतीही लाट ग्राऊंडवर अस्तित्वात नसताना, महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी, महिला अत्याचार, शिवाजी महाराजांचा अपमान, महिला असुरक्षितता, मराठा समाजाचा तीव्र विरोध आणि यासारखे असे असंख्य मुद्दे असताना**



**२२५+ जागा महायुती कशी जिंकू शकते...???**

मुंबईत सभेला माणसे नाहीत म्हणून, सभा रद्द करून पळून जाणारे मोदीजी आणि त्यांची भाजप जिंकूच कशी शकते...???

चार महिन्यांत विकासाच्या नावाने बोंब असताना, असा निकाल माझा महाराष्ट्र देऊच शकत नाही...हा महाराष्ट्रातील जनतेवर लादलेला निकाल आहे!

अनाकलनीय

EVM घोटाळा

**- विश्वंभर चौधरी...**

## अंतरंग




महाराष्ट्रधर्म राखण्यासाठीच आम्ही उद्धव ठाकरेंसोबत!
- राजन राजे

पृष्ठ क्र. ३




सर्व गोष्टीला मुसलमानच जबाबदार आहेत का?
(समाजमाध्यमातून साभार...)

पृष्ठ क्र. ९




केवळ ५ महिन्यात जनमत एवढं बदलतं???
...आनंद भंडारे


पृष्ठ क्र. १३

# नवभारताचा शिल्पकार
# पंडित जवाहरलाल नेहरु....

**आपल्या विचारांच्या विश्वात वावरणारा, त्याचवेळी जनसमुदायाच्या मनावर प्रभुत्व गाजवणारा, सत्ता राबवताना प्रशासन यंत्रनेवर पूर्ण नियंत्रण ठेवणारा, अशा पंडितजींच्या दुर्मिळ गुणांचा प्रत्यय जगाला येत होता. जगभरचे विचारवंत नेहरूंच्या सहवासात खुलत; तर, सामान्य जन त्यांच्या सभांना देशाच्या कानाकोपऱ्यातून त्यांचे विचार ऐकायला अलोट गर्दी करत. त्यांच्यावर अपार प्रेम करत. देशसेवेची तळमळ, त्याग, निर्भयता, प्रसंगी कठोरता आणि मृदुताही हे त्यांचे गुण त्यांचा व्यासंग, मौलिक विचारांची झेप आणि लेखणीचे सामर्थ्य...या गोष्टीही जगन्मान्य झालेल्या आहेत. या सर्व गुणांना अपूर्व उजाळा मिळावा अस रूप निसर्गाने त्यांना दिले होते. एका लेखकाने 'जगातला सर्वात सुंदर वक्ता' असे त्यांचे वर्णन केले होते.**

तसेच एका अमेरिकन पत्रकाराने लिहिले होते की, 'गांधी टोपीला राजभूषणाचे सौंदर्य येत असेल तर, ते नेहरुंच्या डोक्यावर!'

इतिहास, राजकारण, ललित साहित्य व विज्ञानाच्या अनेक शाखांत त्यांना गती होती. विचारवंताचा पिंड असल्याने त्यांची जिज्ञासा कधी कमी झाली नाही. स्टीफन स्पेंडर यांनी नेहरु हे, सर्जनशील कृतिवीर असल्याचे म्हटले आहे. अलबर्ट आयनस्टिन, रोमा रोला, बट्रान्ड रसेल, बर्नाड शॉ, नबकॉव,स्टीफन स्पेन्डर, मिर्डान, किंग्स्ले मार्टिन, अर्नस्ट स्पेलर, टॉयनबी, आन्द्रे मार्ला अशा अनेक थोर विचारवंतांशी त्यांची मैत्री जमली. रवींद्रनाथ टागोर व नेहरु यांना एकमेकांबद्दल विशेष आस्था होती.



**त्यांना महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखालील स्वतंत्र आंदोलनात प्रदीर्घ कारावास घडला. त्यांनी तो वाचन व मनन यात व्यतीत केला. आयुष्याची २७वर्षे स्वातंत्र्यलढ्याच्या धकाधकीत गेली. त्यातील १०वर्षे तुरुंगात गेली. (एकूण सात वेळा मिळून) 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा प्रसिध्द ग्रंथ त्यांनी अहमदनगर किल्ल्यातील कारावासात असताना (१९४२-४५) लिहीला.**

**त्यांचा अखेरचा तुरुंगवास ९ ऑगस्ट १९४२ रोजी सुरु झाला, तो १०४१ दिवसांचा होता. अखेरच्या कारावासानंतर दोन वर्षांनी ते देशाचे पंतप्रधान झाले.**

### पंडित नेहरुंचं योगदान

1948 ITI
1950 Planning Commission
1951 IIT
1952 -IIMS
1954 S-IL
1954 B-RC
1955 Bhilai Steel Plant
1956 ONGC
1958 DRDO
1961 IIM$^2$
1962 ISRO
1964 BHEL

### Top 10 Jawaharlal Nehru Books Of -ll Time.

1. Glimpses Of World History
2. The Discovery Of India
3. Letters From - Father To His Daughter
4. An Autobiography: Towards Freedom
5. Letters For - Nation: From Jawaharlal Nehru To His Chief Ministers 1947-1963
6. A Bunch Of Old Letters
7. Nehru's India : Select Speeches
8. Before Freedom
9. The Essential Writings Of Jawaharlal Nehru
10. Words Of Freedom : Ideas Of - Nation

### पंडितजींची आवडती कविता...जी त्यांच्या टेबलावर असे.

The woods are lovely
dark and deep
But I have promises to keep
And miles to go before I sleep
And miles to go before I sleep
...Robert Frost

(कवितेसाठी तब्बल चार वेळेस पुलित्झर पुरस्कार प्राप्त अमेरिकन कवी)

*समोर सुंदर झाडी आहे*
*दाट अन काळी भोर*
*अजून माझी पुष्कळ कामे*
*तशीच पुढे राहिली आहेत*
*मैल मैल चालायचे आहे*
*पुष्कळ अंतर तोडायचे आहे*
*झोपायला अजून वेळ आहे*
*खूप वेळ आहे*
*खू-प-च वेळ आहे!*

*जयंती निमित्त विनम्र अभिवादन...!!!*
*प्रेषक (व नेहरुंचं रेखाचित्र)*
**...श्या.गो. पाटील**

१) चीनने १९७८ नंतर परकीय भांडवलाचं स्वागत व मुक्त-बाजारपेठीय तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करत...२००१ मध्ये WTO मध्ये प्रवेश करणे,

२) अमेरिका व स्कँडिनेव्हियन देशांसारख्या स्वतःला कट्टर भांडवलदार म्हणणाऱ्या देशांनी भांडवली-व्यवस्थेत समाजवादी विचारसरणीची सरमिसळ करुन 'मिश्र-अर्थव्यवस्थे'चा राबवणं;

३) सिंगापूरसारख्या वेगाने प्रगत झालेल्या दक्षिणपूर्व आशियाई देशात, केवळ मुक्त-बाजारपेठीय 'भांडवली-व्यवस्था'च नव्हे; तर, इतर अनेक अर्थशास्त्रीय-विचारधारा .

..पृष्ठ क्र. ३ वर

# महाराष्ट्रधर्म राखण्यासाठीच आम्ही उद्धव ठाकरेंसोबत! – राजन राजे

## 'धर्मराज्य पक्षा'चा १३वा वर्धापनदिन उत्साहात संपन्न




**भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी पक्ष अशी सर्वमान्य ओळख असलेला आणि कामगार-कष्टकरीवर्गाचा बुलंद आवाज असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'चा १३वा वर्धापनदिन, दि. १६ नोव्हेंबर-२०२४ रोजी, पक्षाच्या ठाणे कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वर्धापनदिनाचे औचित्य साधून, 'धर्मराज्य दिनदर्शिका-२०२५' या नवीन वर्षाच्या कॅलेंडरचे प्रकाशनदेखील राजन राजे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. दरम्यान, विधानसभेच्या निवडणुका अवघ्या काही तासांवर येवून ठेपलेल्या असताना, उपस्थित पदाधिकारी-कार्यकर्त्यांना संबोधित करताना राजन राजे म्हणाले की, गेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये, भाजपला निसटता विजय मिळालेला असल्यामुळे, त्यांचा 'चारशे पार'चा बार मुसका निघालेला आहे. मोदी-शहा यांच्या रासवट-राजकीय प्रवृत्तीविरोधात, भारतीय जनतेमध्ये उसळलेला जनक्षोभ उसळल्यामुळेच भाजपला त्यांची जागा दाखविण्यात काही अंशी यश आलेले असले तरी, येत्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत, महायुती सरकारला राज्यातून संपूर्ण नेस्तनाबूत करावेच लागणार आहे.** ज्यापद्धतीने भारतीय जनता पक्षाने, शिवसेनेचे ४० आमदार फोडून, एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपदाच्या नावाखाली आपले 'मिंधे' बनवून, उद्धवजींच्या पाठीत खंजीर खुपसला, हा महाराष्ट्रद्रोही आणि महाराष्ट्रधर्म बुडविणाऱ्या गद्दारांना, आपल्या टाटाखालची पोकळ सत्ताधारी मांजरं बनविणाऱ्या 'गुजराथी-लॉबी'नेच घडविलेला हा, संतापजनक आणि अश्लाघ्य प्रकार असल्यामुळेच, निव्वळ महाराष्ट्रहित जोपासण्यासाठी व महाराष्ट्रधर्म राखण्यासाठीच, 'धर्मराज्य पक्षा'ने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला पाठींबा दिला असल्याचे राजन राजे यांनी यावेळी स्पष्ट केले. मालवणात शिवरायांचा तकलादू पुतळा उभारुन, समस्त मराठी जनतेच्या अस्मितेच्या केलेल्या, घनघोर श्रेणीतल्या अपमानाचा सूड, येत्या विधानसभा निवडणुकांच्या निकालात, जनता-जनार्दनाकडून नक्कीच उगवला जाईल, असा प्रखर आशावाद 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी यावेळी बोलून दाखवला. दरम्यान, 'धर्मराज्य पक्षा'च्या १३व्या वर्धापनदिनाच्या या कार्यक्रमाप्रसंगी पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे, सचिव जयेंद्र जोग, सहसचिव नरेंद्र पंडित, खजिनदार अजित सावंत, ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर, उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर, सचिन शेट्टी, ठाणे लोकसभा सचिव विनोद मोरे यांच्यासह, 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, सचिव समीर चव्हाण; तसेच, पक्षाचे पदाधिकारी-कार्यकर्ते आणि कामगार संघटनेचे कामगार सदस्य व कामगार युनिट प्रतिनिधी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

---

## नवभारताचा शिल्पकार... ...पृष्ठ क्र. २ वरुन

एकाचवेळेस सुखाने नांदत असणं सिंगापुरमधील ९०% जमीन सरकारच्या ताब्यात असते, ८५% घरे सरकारच्या पूर्णतया मालकीच्या असलेल्या महामंडळाकडे असते आणि सिंगापूर एअरलाईन्ससकट २२% नैसर्गिक सेवा-संसाधनांवर 'मालकी सरकारची'च असते 'इकॉनॉमिस्ट मॅगझिन' किंवा 'वॉलस्ट्रीट जर्नल' तुम्हाला, सिंगापुरच्या 'मुक्त-व्यापार व्यवस्था' (Free Trade Policy); तसेच, परकीय गुंतवणूकदारांना मोकळं रान देण्याबाबतच्या सिंगापूर-प्रारुपाचा (Singaporean Model) गवगवा करताना कायम दिसतील...पण, ते किंवा इतर कुठलीही भांडवली मुखपत्रे-माध्यमे, तुम्हाला हे वास्तव कधिही सांगत नाहीत....


...या जगभरातील अर्थव्यवस्थांच्या आजवरच्या वरील नमुनेदार स्थित्यंतरांकडे व अनेक देशांच्या आजच्या दारुण 'अवस्थे'कडे पाहिल्यानंतर भारत आधुनिक व सुस्थिर बनवण्यासाठी 'मिश्र-अर्थव्यवस्थे'चा पं. जवाहरलाल नेहरुंनी केलेला अंगिकार...त्यांच्या अमोघ दूरदृष्टीचं प्रत्यंतर देत, त्यांना आभाळाएवढं मोठा करतं!

**जर भारतीय अर्थव्यवस्थेतला भ्रष्टाचार, पुढील राजकीय नेत्यांकडून निपटून काढला गेला असता व लोकसंख्या-नियंत्रित राखली गेली असती; तर, पं. नेहरुंचा, हा 'मिश्र-अर्थव्यवस्थे'चा प्रयोग कमालीचा यशस्वी होऊन भारत 'सिंगापूर'च्या स्पर्धेत असता... पण, ज्या काँग्रेसी नेत्यांना गांधी-नेहरु ना कधि समजले, ना कधि समजावून घ्यावेसे वाटले... तेच, राज्यकर्ते बनले आणि त्यांच्याशी हातमिळवणी करुन बहुतांश सनदी-अधिकाऱ्यांनी हा देश लुटला व आर्थिक-विषमतेच्या नंगानाचामुळे देश व समाज हळूहळू दुभंगत गेला. त्यामुळेच, आर्थिक-विषमतेतून निर्माण झालेला हा आर्थिकस्तरावरील दुभंग... जातधर्म-विद्वेषाकडे वळवत नेणं, हे भाजप-संघ विचारसरणीला सहजसाध्य झालं!**

स्वतः प्रचंड बुद्धिमान, प्रगाढ व्यासंग असलेले राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्याती असलेले नेते असूनही नोव्हेंबर-१९५८ मध्ये केंद्रीय पाटबंधारे व जल महामंडळासमोर, ''छोट्यामोठ्या प्रकल्पांचे होणारे सामाजिक परिणाम'', या विषयावर भाषण करताना... पं. नेहरुंनी, मोठ्या धरणांसारख्या महाकाय प्रकल्पांना, स्वतःच उभारलेल्या ''मंदिरांच्या मखमाली सजावटी''तून ओढून बाहेर काढत, थेट ''अवाढव्यतेचा महारोग'' असं विषादपूर्ण व अर्थपूर्ण संबोधनं दिलं होतं! भाषणात पुढे जात, ''हा, विकासाची कास धरणाऱ्या भारतातला अत्यंत धोकादायक विचारप्रवाह'' असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं होतं.... पण, या अशा अतिशय विचारगर्भ व महत्त्वपूर्ण बाबी आमच्यासमोर कधिचं मांडल्या जात नाहीत (संदर्भ: Nehru Memorial Museum and Library-१९८८).

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेचच पं. नेहरुंनी, ज्या समाजवादी वळणाच्या 'आर्थिक-सुधारणा' (आजच्यासारख्या 'मानवी-चेहरा' ठोकरुन मोजक्या भांडवलदारांच्या हितासाठी क्रूरपणे राबवल्या जाणाऱ्या 'Neo Liberal' आर्थिक-सुधारणा नव्हेत) हाती घेतल्या...ज्यात, **बड्या जमीनदारांकडच्या जमिनी काढून घेऊन सार्वजनिक-कामांसाठी व गोरगरीब भूमीहिनांना वाटण्यासाठी विविध राज्यांतील जमीन-सुधारणा विधेयके वगैरे होती.... ती विधेयके आणण्यात व राबवण्यात 'घटनात्मक' मोठा अडसर हा होता की, ''खाजगी संपत्तीचा अधिकार, हा मूलभूत अधिकार होता''...पण, सर्वप्रथम पं. नेहरुनी व त्यानंतर त्यांची कन्या इंदिरा गांधी यांनी, आपापल्या पंतप्रधानपदाच्या काळात मोठ्या कष्टाने व दूरदर्शीपणे जी समाजवादी-धोरणांची पायाभरणी केली; त्यावरच कळस चढवत मोरारजी देसाई यांच्या जनता दलाच्या सरकारच्या काळात १९७७ साली, हा संपत्तीचा मूलभूत अधिकार 'घटनाबदल' करुन संपवता येऊ शकला व तो एक सामान्य कायदेशीर-हक्क बनला!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



**प्रबोधनकार:** मी जर व्हाईसरॉय झालो; तर, प्रथम देशातली सगळी देवळं, मशिदी आणि चर्चेस जमीनदोस्त करून टाकीन!
**सुभेदार:** अहो, पण काही देवळात फार छान छान मूर्ती असतात.
**प्रबोधनकार:** मग त्या एका ठिकाणी सावडून त्या सुंदर मूर्तींचे प्रदर्शन करवावे – आणि बाहेर 'भिक्षुकशाहीचे पुरावे' – अशी पाटी ठोकावी!
**सुभेदार:** रिकाम्या देवळात शाळा काढाव्यात.
**प्रबोधनकार:** छे, छे! तेथे दारूची पीठे उघडावीत... दारू पिऊन माणसाचा जितका अधःपात होतो, त्यापेक्षा शतपट अधःपात भिक्षुकशाही पुराणांनी आणि देवळांनी केलाय!

*(संदर्भ: प्रबोधनकार ठाकरे, माझी जीवनगाथा, पान ३९७, नवता आवृत्ती २०१३)*

मानवी-उत्क्रांतिच्या शिडीची आखणी करताना... जीवाष्मांचा शोध व काळानुसार त्यांची क्रमवार मांडणी करत, हाडामांसातच अडकून पडलेला 'ओरिजिन ऑफ स्पेसिज'चा ग्रंथकार चार्ल्स डार्विन...प्राणीतुल्य उन्मुक्त लैंगिक व तत्सम व्यवहारांतून माणसातल्या 'पशुत्वा'लाच जणू, त्याकाळी आवाहन करत होता व त्याला तात्त्विक अधिष्ठान देऊ पहात होता...'भांडवली-व्यवस्थे'तला प्रत्ययही तसा म ारसा वेगळा नसतोच... "Corporates are all about Animality"! भांडवलशाहीत आपण त्याचं प्राणीतत्त्व-ाचा (Animality) व्यवहारात दाहक अनुभव घेत असतो. परिस्थितीवशात 'भांडवली-व्यवस्थे'चे भोई, पाईक एवढंच नव्हे; तर, अगदी 'दलाल' बनलेली मंडळीही एकवेळ समजून घेता येऊ शकतात; पण, भांडवलशाहीचा पुरस्कार करणारे, तिचे पुरस्कर्ते मात्र, बिलकूल समजून घेता येत नाहीत.

*...राजन राजे (भाई)* दि.११/०७/२०२४

गौतम बुद्धाने मुळातूनच शास्त्रीय चिकित्सा करत, ''माणूस दुःखी आहे आणि दुःखाला कारण आहे व ते कारण दूर करता येऊ शकतं''... हे 'वैश्विक सत्य' निर्विवादरित्या मांडलं. हे सर्व करताना गौतम बुद्धाने... जगात देव तसेच, स्वर्ग-नरक आहे की नाही; इ. संकल्पनांच्या संदर्भात भाष्य करत रहाण्यातून व्यर्थ वेळ दवडणं टाळलं; पण, मानवी-कल्याणाची काळजी आपल्या खांद्यावर एकहाती वाहताना मनुष्यजातीला दुःख निवारणाचा 'अष्टांगिक मार्ग सांगितला. एच. जी. वेल्स हा विचारवंत, गौतम बुद्धाबाबत बोलताना उद्गारला, "Gautam Buddha..so Godliike, but so Godless"! त्याच तालावर 'भांडवली-व्यवस्थे बाबत म्हणावं लागतं, "Capitalism..so Devillike, but so devilless..." चिन्मय' मनुष्यमात्राला, 'मृण्मय' वा चेतनाविहीन निर्जीव वस्तूसारखी वागवणारी!!!

*...राजन राजे (भाई)*दि.१४/०७/२०२४

आश्चर्य या गोष्टीचं की, कार्ल मार्क्सला चार्ल्स डार्विनबद्दल नितांत आदर होता; तो इतका पराकोटीचा की, प्रसिद्धीपश्चात जग कायमस्वरुपी बदलणारा, आपला ऐतिहासिक ग्रंथ 'दास कॅपिटल' त्याने डार्विनला समर्पित केला होता. 'उत्क्रांतिचा सिद्धांत' मांडणारा डार्विन काय किंवा डम स्मिथसह सरसकट सगळेच भांडवलप्रधान विचारवंत वा त्यातील 'अंतर्विरोधा'चं व त्यातून चक्राकार पद्धतीने उद्भणाऱ्या जागतिक-महामंदीसारख्या आर्थिक-महासंकटांचं खोलवर विश्लेषण-संश्लेषण करणारा कार्ल मार्क्स काय...या सगळ्यांनीच केवळ 'वस्तूमय' जगाचाच (Materialism) विचार केला आणि त्यातून मानवी कल्याण-अकल्याणाची मांडणी केली. चार्ल्स डार्विनही आपल्या 'उत्क्रांतिच्या सिद्धांता'तून जीवाष्मरुपी हाडांच्या सांगाड्यांतून वस्तूमय जगाशीच रुजवात करत होता.



*...राजन राजे (भाई)* दि.१५/०७/२०२४

# वेदीका कळंत्रे यांची पोस्ट....

**२०१२ मध्ये भाजपने प्रचार सुरु केला होता की, सोनिया गांधी २०० अब्ज रु. च्या मालकीण असून जगातल्या ४थ्या सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत....**

**सोबत, अनेक काँग्रेस व इतर लोकांची पण आकडेवारी व्हॉट्सपला फिरवण्यात आली....**

**त्यासोबत, त्यानी कोळसा घोटाळा १ लाख ७६ हजार कोटी, २ जी स्पेक्टरम घोटाळा १ लाख २० हजार कोटी सारख्या अनेक घोटाळ्यांचे आकडे दिले....**

सोबतच, भाजपने हा पण प्रचार सुरू केला की, हा सर्व पैसा परदेशात असून मोदी सत्तेत आल्यानंतर, ही पै न पै देशात आणून वाटली जाईल...हा सर्व पैसा टॅक्स भरत असलेल्या जनतेच्या पैशातून लुटला गेला आहे... त्यातून, लोक आपल्याला १५ लाख रु. मिळतील, या आश्वासनाला भुलले...

ही अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने तयार केलेली प्रचार-यंत्रणा होती....

'हंसा पब्लिसिटी' या संस्थेला मोदींचा मेक ओव्हर आणि ब्रँडिंग करायला ७०० कोटी रु. दिले गेले होते...परेश रावल ने ८ महिने मोदींना 'डायलॉग डिलिव्हरी' शिकवून बदल्यात 'खासदार'की मिळवली....

अण्णा आंदोलनातून मोठ्या प्रमाणावर तरुणवर्गाला भुरळ पाडली गेली. प्रशांत किशोरने हे मुद्दे बनवले होते...

मीडियात पेरलेल्या 'संघी' लोकांना तयार करण्यात आले होते...

यासाठी, प्रचंड प्रचार कौशल्य असलेली आयटी सेल बनवण्यात आली....

यात अडचण राहुल गांधींची होती....

त्यामुळे त्याची पद्धतशीरपणे या साम्राज्याचा युवराज पण, प्रत्यक्षात लायकी 'पप्पू'ची अशी इमेज बनवण्यात आली....

या सर्व प्रचारामुळे लोकांना विशेष करून तरुणवर्गाला मोदी, भाजपचे जबरदस्त आकर्षण निर्माण झाले....

...आणि, एक चांगल्या मार्गाने सुसंपन्न स्थितीत असलेला देश भाजपच्या ताब्यात गेला....

प्रशासनात पेरलेले 'संघी' उघडपणे भाजप / मोदीकडे गेले....

## आज ७ वर्षानंतर परिस्थिती काय आहे?

संपूर्ण यंत्रणा संघ आणि मोदींनी ताब्यात घेतलीय... कोर्टाने यातला कोणताही घोटाळा झाला नसल्याचे म्हटले....

२०० अब्ज रु संपत्तीची मालकीण असल्याचा सोनिया गांधींबद्दलचा आरोप खोटा ठरला....

भाजप पक्षाचा आजचा अधिकृत बँक बॅलन्स २२७८ कोटी आणि प्रॉपर्टी १३००० कोटींची....

आणि, नेत्यांची संपत्ती वेगळीच....

**उलटपक्षी, काँग्रेसचा बँक बॅलन्स १७८ कोटी आणि ७० वर्षात कार्यालये वगैरे उभी केलेली प्रॉपर्टी ५७५ कोटी आणि नेत्यांची संपत्ती वेगळी....**

**काँग्रेसचा वा इतर कुठलाही नेता जेलमध्ये गेला नाही...**

**१५ लाख कधि आलेच नाहीत....**

**परदेशातून कुठलंही काळं धन आलं नाही...**

**सुसंपन्न भारत दुप्पट कर्जात बुडाला....**

**मोठ्या उद्योगपतींनी लाखो कोटी रु.ची कर्जे बुडवली...**

**भाजपने यात भरपूर कमिशन कमावले....**

**नीरव मोदीने तर, इंग्लंडच्या कोर्टात पैसे देऊन रीतसर आल्याचे सांगितले....**

**१२ कोटी रोजगार बुडाले....**

**असं कुठलंही क्षेत्र राहिलं नाही**

**जिथून जनतेची प्रचंड लूट होत नाहीय....**

**देशाची संपत्ती मूठभर लोकांच्या हातात गेली....**

**सामाजिक एकता संपली....**

**आपण आता कधी यातून बाहेर पडू शकू, याची शक्यताही दिसत नाहीय...**

**मी काँग्रेसचं गुणगान करीत नाहीये...**

**फक्त, गेल्या १० वर्षात काय घडलं, आपण कसे फसलो, एवढंच दाखवून देतेय....**

मी जे बोलतेय ते
भाजपसारखे खोटे बोलत नाहीय....
सगळं सत्य तुमच्यापुढे पुराव्यानिशी उघड झालंय....
संघ, मोदी, भाजप किती भयाण गोम आहेत... हे अजून तरी तुमच्या लक्षात आलं नसेल तर दुर्दैव...
विचार करावा.....
७ वी नापास अशिक्षिताला पाठिंबा देणाऱ्या उच्चशिक्षित अंध आणि मंदभक्तांनी !

*– वेदीका कळंत्रे.*

# 'सॅमसंग' संपकरी-कामगारांच्या ऐतिहासिक विजयाचा अन्वयार्थ....

(लेख अनुक्रमांक ३)

**...अर्थातच, 'कामगार-चळवळ' आणि पावसाळ्यातील 'गांडुळांची वळवळ'... हे जवळपास समानार्थी शब्द बनण्याचा संपूर्ण दोष, केवळ मराठी-कामगारांना देण्यात बिलकूल हशील नाहीच; कारण, चारपाच दशकांपासून आमच्या मराठी-मनावर 'गारुड' करुन बसलेल्या प्रभावशाली 'भांडवल-धार्जिण्या' राजकीय नेत्यांकडूनच टप्प्याटप्प्याने व अत्यंत पद्धतशीरपणे मराठी-कामगारांचं 'खच्चीकरण' करण्यात आलंय ज्याचा पहिला टप्पा, हा साम्यवाद्यांना 'लाल माकडं' म्हणून हिणवत त्यांची प्रचंड नालस्ती करण्याचा...भडक माथ्याच्या अविचारी-अविवेकी मराठी-तरुणांना कृष्णा देसाईंसारख्या साम्यवादी (कम्युनिस्ट) नेत्यांवर 'हल्लाबोल' करण्याला प्रेरित करण्याचा; तसेच, भांडवली-व्यवस्थेकडून उघडपणे 'सुपारी' घेत डॉ. दत्ता सामंतांसारख्या स्वतंत्र बाण्याच्या लढाऊ कामगार-नेत्याचे संप जागोजागी मोडण्याचा होता... व त्या 'महापातका'ची कटू फळं, आजही आणि उद्याही, सगळी मराठी-जमात भोगते आहे, भोगणार आहे!**

...एका 'बाबासाहेबा'ने मेल्या मनांच्या माणसांमध्ये गुलामगिरी-अस्पृश्यतेविरुद्ध स्फुल्लिंग चेतवलं; पण, एतद्देशीय गुजराथी-भाषिक आणि परदेशीय बहुराष्ट्रीय (मल्टिनॅशनल) 'भांडवली-व्यवस्थे'शी हातमिळवणी करणाऱ्या आमच्या मराठी 'राजकीय-दुकानदारसाहेबां'नी मात्र, ''कारखाना जगला तर, कामगार जगेल'', अशी 'कामगारद्रोही' हाकाटी उठवून, हाकारे देऊन... 'कंत्राटी-कामगार पद्धती'ची 'गुलामगिरी' व 'नवअस्पृश्यता' महाराष्ट्रात रुजवली-वाढवली!

ही हाकाटी-हे हाकारे, महाराष्ट्र नावाच्या उद्यमनगरीत तोवर गुंजत राहिले; जोवर, 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ने, ''कामगार सन्मानाने जगला; तरच, कंपनी-कारखाना जगेल...अन्यथा, नव्हे'', असा प्रखर प्रत्युत्तर देणारा नारा दिला नव्हता! पण, तो नारा देत कामगारांचं धैर्य, अस्मिता जागी करण्यासोबतच, ''आळशी-उद्धट कामगार राष्ट्राला भार...मेहनती-नितीमान कामगार राष्ट्राला आधार'', असा कामगार-कर्मचारीवर्गात नैतिकतेची रुजवात करणारा विधायक नारादेखील 'धर्मराज्य'ने न चुकता दिलाच!

'आऊटसोर्सिंग' काय किंवा NEEM अथवा लष्करातील 'अग्निपथा'वरील आगीत तरुणाईला पोळून काढणाऱ्या 'अग्निवीर'सारख्या नवतांत्रिक-व्यवस्था काय... ही सारी, 'रक्तपिपासू-निर्दय-शोषक व्यवस्थे'च्या (Vampire-State System) 'कृष्णविवरा'ने प्रसवलेली, तिथल्या दाट काळोखाशी नात सांगणारी काळीकुट्ट 'पिल्लं'च होतं... ज्यांनी, अवघ्या कामगारविश्वावर अंधारयुगाचं सावट आणलंय.

...त्याचीच परिणती, आजच्या कामगार-कर्मचारीवर्गाच्या अवनत-अवमानित अवस्थेत झालीय!

(लेख अनुक्रमांक ४)

कामगार-कर्मचारीवर्गाची हीनदीन, अवनत-अवमानित अवस्था निर्माण होण्याचं दुसरं प्रमुख कारण म्हणजे... त्यांच्यात एकप्रकारे 'बुद्धीमांद्य' निर्माण करुन, त्यांना जीवन-संघर्षापासून दूर नेणाऱ्या आणि त्यांना 'दैववादी' बनवणाऱ्या यच्चयावत सगळ्याच धर्मसंप्रदायांची महाराष्ट्रभरात झालेली मोकाट पैदास!

**'हिंदुत्वा'च्या भंडाऱ्याची उधळण करतच महाराष्ट्रात 'दैववादा'ला व किंकर्तव्यमूढतेला एकच उधाण आणण्यात आलं....त्याचाच भाग म्हणून पावसाळ्यात उगवणाऱ्या कुत्र्यांच्या-कावळ्यांच्या छत्र्यांप्रमाणेच बैठक-संप्रदाय, बापू संप्रदाय, जीवनमिशन, आर्ट ऑफ लिव्हिंग, स्वाध्याय-परिवार, ब्रह्मकुमारी यासारखे नवनवीन धर्मसंप्रदाय महाराष्ट्रात जागोजागी उगवू लागले, फोफावू लागले व ही 'भांडवली-व्यवस्था', त्याला चांगलंच खतपाणी घालू लागली. संघर्ष करायचा शिवछत्रपतींचा-बाबासाहेबांचा वसा टाकून देऊन 'मराठी-समाजमन' या नवनव्या आध्यात्मिक खेळण्यांशी खेळत बसलंय.**




त्यामुळेच, पडद्याआड संगनमत असलेल्या, अशा धर्मसंप्रदायांच्या नादी लागून 'दैववादी' बनलेला कामगार, आपल्या भविष्याचे दोर नियतीच्या हाती सोपवून बेजबाबदारपणे मोकळा होताना दिसतोय... कृष्णासारखा कुणी अवतार घेईल किंवा किमानपक्षी एखादा शिवाजी, एखादा बाबासाहेब पुन्हा अवतीर्ण होईल आणि या गुलामगिरीच्या कोंडीतून माझी सुटका करेल... अशा भाकड आशेवर तो जगू पहातोय व आपल्या नाकर्तेपणावर-षंढवृत्तीवर, अशा धर्मसंप्रदायांत सामील होऊन तो 'धार्मिक-मुलामा' बेमालूम देऊ पहातोय, हे भविष्याच्या दृष्टीने फारच धोकादायक आहे.

मराठी-नैराश्याचा विस्फोट होऊन 'विद्रोहाची आग' भडकू नये... म्हणून, जे 'आध्यात्मिक लेप लावलेलं खेळणं' मराठी हातामध्ये देण्यात आलं, ते अजूनही हातात खुळखुळ्यासारखं घेऊन आमची मराठी-जमात, तशीच दिशाहीन अवस्थेत बसलेली आहे...लहान मुलं हातातलं खेळणं लवकर टाकून देतात व नव्या खेळण्याचा हट्ट धरतात; हे चांगलंच जाणून असणारी व्यवस्था... IPL क्रिकेट सामने, टीव्हीवर नवनवीन मालिका, नवनव्या करमणुकीच्या टूम काढतातच आहेत. पण, आमची मराठी-जमात हे आध्यात्मिक-खेळणं, सर्वनाश समोर दिसत असूनही हातातलं सोडायला तयार नाही, या दुर्दैवाला काय म्हणायचं? तत्त्वतः कुठल्याही आध्यात्मिक-व्यवहाराला विरोध असण्याचं कारण नाही; पण, त्यातून शिवछत्रपतींसारखा ''देव मस्तकी धरावा, अवघा हलकल्लोळ करावा'' असं काही निष्पन्न व्हायला हवं... संघर्षाला तिलांजली देऊन, जातिवंत व सच्च्या लढाऊ बाण्याचं विसर्जन करुन; जर समाज, निष्क्रिय अध्यात्माची प्रतिष्ठापना करु पहात असेल...तर, त्याला या बनावट आध्यात्मिक निद्रेतून गदगदा हलवून जागं करावचं लागेल!

**...पण, महाराष्ट्रातील अनेकोनेक 'बुद्धीमांद्य' निर्माण करणाऱ्या व त्याद्वारे, जीवन-संघर्षापासून दूर नेत 'दैववादी' बनवणाऱ्या धर्मसंप्रदायांच्या नादी लागलेला; तसेच, सार्वजनिक पूजा-गणेशोत्सव-चैत्रोत्सव, दहीहंड्या, गरबे, भंडारे अशा 'फाजिल' उत्सवप्रियतेत अडकलेला व दारुबाजी-क्रिकेट, वाढदिवस-सोहळे, पार्टीसंस्कृती...या आयुष्य वाया घालवणाऱ्या अतिरेकी करमणुकीत आकंठ बुडालेला मराठी कामगार-कर्मचारीवर्ग, आपल्या ग्लानीतून जागा होईल तर शपथ!**

...आणि, बहुशः 'कंत्राटी-गुलाम' असलेला मराठी-कामगार, त्याच्या काळझोपेतून कधि जागाच होऊ नये म्हणूनच तर, (ग्राम्य भाषेत बोलायचं तर); ..पृष्ठ क्र. ६ वर

**'सॅमसंग' संपकरी.......**पृष्ठ क्र. ५ वरुन

महाराष्ट्रात सध्या मातलेल्या अगदी 'नीचोत्तम' पातळीवरील गद्दारी व पक्षबदलू राजकीय रणधुमाळीत... राजकारण्यांच्या हगल्यापादल्याच्या बातम्या दिवसाचे २४ तास देणारा मराठी प्रिंट-मिडीया व इलेक्ट्रॉनिक-मिडीया... सॅमसंग-कंपनीतील एवढ्या मोठ्या कामगार-संघर्षाविषयी तब्बल ३८ दिवस मूग गिळून गप्प का होता? हल्ली मराठी-वृत्तपत्रसृष्टीसह महाराष्ट्रातील सगळ्या टीव्ही-चॅनेल्सनी जणू 'कामगारविश्वा'वर बहिष्कार टाकल्यागत, अशा स्वरुपाच्या कामगार-संघर्षाच्या बातम्या देणंच थांबवलंय की, काय? की, या देशात मातीला एकवेळ किंमत आहे; पण, कामगारांना काडीचीही किंमत नाही, अशी त्यांची धारणा बनलीय?? 'गोदी-मिडीया'ला, हे असले 'आदेश' देतो कोण??? ...बिल्किस बानोच्या बलात्काऱ्यांचे सत्कार करणाऱ्या, हरयाणाच्या निवडणुकीत बलात्कारी राम रहिमला खास पॅरोल देणाऱ्या आणि बिश्नोईसारख्या गुंडाला सांभाळत पडद्यामागून आदेश देणाऱ्या तथाकथित 'हिंदुत्ववादी' मंडळींचंच हे काम नव्हे; तर, अन्य कुणाचं?

## (लेख क्रमांक ५)

मराठी कामगार-कर्मचारीवर्गाची हीनदीन, अवनत-अवमानित अवस्था निर्माण होण्याचं तिसरं प्रमुख कारण म्हणजे...जगभरात प्रगत देशांमध्ये कामगारविश्वाभोवतीच राजकारणाची दुनिया फिरत असते आणि कामगार नेतेच बव्हंशी देशाचं राजकारण चालवतात... तर, आमच्या महाराष्ट्र-देशात याच्या पूर्णतः विपरीत स्थिती आहे! 'कामगार-धर्मा'च्या अथवा कामगारांच्या 'वर्ग-जाणिवे'च्या दृष्टीकोनातून कामगार-कर्मचारीवर्ग निद्रिस्त असल्यामुळे, जाज्वल्य कामगार नेत्यांना राजकारणात काळं कुत्रं देखील विचारत नाही! आणि, त्यामुळेच, त्यांच्यात फूट पाडणं, हा भांडवलदारवर्गाच्या (हा भांडवलदारवर्ग कंपनीत, सुपरवायझरपासून सुरु होत कंपनीच्या CEO व मालकांपर्यंत येऊन संपतो) हातचा मळ ठरतो!

भांडवलशाहीत कामगारांच्या हातून त्यांची परंपरागत उत्पादन-संसाधने (उदा. सुतारकाम, विणकाम, लोहारकाम वगैरे करणाऱ्यांची त्या त्या कामाची अवजारे वा हत्यारे) हिसकावून घेतली जाऊन, ती पूर्णतया भांडवलदारांच्या ताब्यात आल्याने, कसबी कामगाराला त्यांच्या कंपन्या-कारखान्यांमधे कामासाठी जावं लागते व तेथे ते असहाय्यतेचा सतत सामना करत रहातात...त्यामुळे, ''कामगार किंवा कर्मचारी म्हणून, आपल्याप्रमाणेच इतरांच्या व पुढील पिढ्यांच्या हिताचा विचार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आपसूकच येऊन पडते व त्यासाठीच, सदैव संघटित राहून सर्वांच्या हिताच्या दृष्टीने विचार व निर्णय करणं त्यांच्यासाठी बाध्य ठरतं, ज्याला कार्ल मार्क्स निवडीद्वारे (उदा. सर्वसंमतीने वा मतदानाद्वारे) आपापसात निर्माण झालेली आत्मीयता'' (Elective Affinity) म्हणतो!''

...पण, महाराष्ट्रात विशेषतः, राजकारण जनसामान्यांच्या जगण्याच्या आसाला भिडलेल्या मुद्द्यांवर चालण्याऐवजी भावभावनांच्या निष्फळ कल्लोळावर आणि तथाकथित नेत्यांच्या वैयक्तिक 'करिश्म्या'वर म्हणजेच, भल्याबुऱ्या मार्गाने राखलेल्या निव्वळ जनसंपर्कावरच (उदा. लग्न-वाढदिवस सोहळ्यांमधली उपस्थिती व ज्यात अंत्यसंस्कार प्रसंगही आलेच, सार्वजनिक मंडळांच्या भेटीगाठी व त्यांना रसद-पुरवठा, रस्त्यांच्या कानाकोपऱ्यातली शहरं पूर्ण विद्रूप करणारी फालतू बॅनरबाजी, सार्वजनिक हिताचा काडीमात्र विचार न करता अथवा तशी धोरणं न आखता केवळ जनतेच्या छोट्यामोठ्या व्यक्तिगत कामांवर लक्ष केंद्रित करणं वगैरे वगैरे) व एकूणच भपकैबाजीवर राजकारण अतिशय उथळपणे चालत रहातं...आणि, म्हणूनच महाराष्ट्रातली आम मराठी-जमात देशोधडीला लागलीय.

## (लेख क्रमांक ६)

महाराष्ट्रात तसे 'रोजगार' नाहीत, असं काही नव्हे; ते आहेतच...'बेरोजगारी' ही महाराष्ट्रातल्या मराठी-माणसाची अनेक समस्यांपैकी एक समस्या असली; तरी, त्याहूनही मोठी (अगदी, महाराष्ट्रभरात अक्राळविक्राळ पसरलेली) समस्या म्हणजे, 'अर्धरोजगारी'ची समस्या होय... 'अर्धरोजगार', म्हणजे ज्या रोजगाराच्या तुटपुंज्या मिळकतीत संसाराची गोधडी धड शिवता येत नाही, संसाराचा गाडा सन्मानाने नीट हाकता येत नाही आणि जो रोजगार, अतिशय असुरक्षित बेभरवशी म्हणून 'गुलामगिरी'स्वरुप असतो, असा रोजगार!

त्यामुळेच, गणपती-दसरा-दिवाळसणांसारख्या दिवसात, 'लक्ष्मी'ची पावलं व्यापारी-जमातीच्या म्हणजेच... अर्थातच; जैन, गुजू, मारवाड्यांच्या घरात शिरताना; तर, मराठी-घराघरांमधून ती बाहेर पडताना दिसतात ('लक्ष्मी-पुजना'ची मराठी-घराघरांतील लक्ष्मीची 'उलटी' पावलं)



आणि साध्या सणावारी मराठी-घरं आर्थिक-विवंचनेच्या कचाट्यात सापडतात...मग, घरातल्या एखाद्या मोठ्या आजारपणात, मुलांच्या महागड्या शिक्षणात वा लग्नकार्यात काय अवस्था होत असेल; याची कल्पनाच केलेली बरी... म्हणूनच, महाराष्ट्रात शहरी-निमशहरी भागात लाखो-हजारो 'अर्धरोजगारां'च्या सहकुटुंब आत्महत्या होत असतात, ज्या आत्महत्यांची गणितीसंख्या व त्यात रुतलेली भीषण करुणा, ही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपेक्षाही जास्त मोठी, जास्त गहरी असते; फक्त, ही रक्तपिपासू-निर्दय-शोषक 'भांडवली-व्यवस्थाफ (Vampire-State System) ती झाकून ठेवते...जाणिवपूर्वक त्या कामगारांच्या आत्महत्यांना शेतकऱ्यांच्या आत्महत्येप्रमाणे ''अर्धरोजगार-कामगारांची आत्महत्या'', असं 'ब्रॅण्डिंग' होऊ देत नाही...कारण, पुन्हा ते आणि तेच, जे विविध धर्मसंप्रदाय पोसून मराठी-जनमानसावर 'आध्यात्मिक विलेपन करण्यामागे असतं; ते, म्हणजेच, ''मराठी-नैराश्याचा एकदम विस्फोट होऊन 'विद्रोहाची आग' भडकू नये, हेच!''

'सुरजित भल्ला' या मोदी सरकारचे सल्लागार असलेल्या व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत कार्यकारी संचालक म्हणून काम केलेल्या, भांडवली-विचारसरणीच्या (डाव्या विचारसरणीच्या नव्हे) नामांकित अर्थतज्ज्ञाने प्रतिपादन केल्याप्रमाणे ग्रामीण महाराष्ट्रातील ग्रामीण दारिद्र्य, हे २५%च्या राष्ट्रीय-सरासरीपेक्षाही खालच्या पातळीचं म्हणजे, २६.५% आहे (म्हणजे, बिहारच्या २३.५%च्याही खालचं)...महाराष्ट्रातील शहरी-निमशहरी, विशेषतः बहुभाषिक-बहुसांस्कृतिक (कॉस्मॉपॉलिटन) शहरांमधून ऊतू जाणाऱ्या विकृत श्रीमंतीचा डोळ्यात खुपणारा 'सातबारा', हा बव्हंशी गुजराथी-भाषिक 'अमराठी' लोकांच्या नावावर असतो आणि त्या अतिश्रीमंतीच्या 'सातबाऱ्या'वर कुठे 'मराठी' आडनावं अभावाने आढळलीच; तर, ती असतात...हमखास राजकारण्यांची (त्यातल्या त्यात, जास्तीत जास्त 'बिल्डर' आणि विविध प्रकारच्या 'कंत्राटदार' राजकारण्यांची) व सरकारी-अधिकारीवर्गाची असतात... शहरात फक्त 'हवा' (ती ही प्रदूषित) मोफत मिळत असल्याने व बाकी सगळ्याच जीवनावश्यक बाबी, या महागड्या शहरांनी सामान्य मराठ्यांसाठी 'ईद का चाँद'सारख्या दुर्लभ बनवल्या असल्याने, शहरी 'मराठी-जगणं', शब्दशः जहरी बनलं आहे! देशात बँका, तत्सम अर्थसंस्था (NBC) वा खाजगी सावकारांकडून घरातलं सोनं गहाण ठेऊन आपत्कालीन-कर्ज उचलण्यात, दुर्दैवाने सामान्य मराठी-माणसं आघाडीवर आहेत!

महाराष्ट्रात हजारो कोटींची 'महागुंतवणूक' कधि येते, कधि वाकुल्या दाखवत गुजराथेत जाते...पण, येणारी प्रत्येक गुंतवणूक, ही कमीतकमी 'थेट' रोजगार (ते ही मोठ्याप्रमाणावर 'कंत्राटी-गुलामी'तलेच) देणारी व त्याच्या कैकपटीने जास्त 'अप्रत्यक्ष' रोजगार देणारी (म्हणजेच, 'आऊटसोर्सिंग'मधले 'अर्धरोजगार') असते; पण, त्या तथाकथित फडतूस रोजगारांच्या विपुल संधिंविषयी सत्ताधारी शिरा ताणून कौतुकाने बोलत रहातात... आणि, इकडे 'आऊटसोर्सिंग' (OutSourcing)च्या माध्यमातून मोठ्या कंपन्यांच्या जीवावर जगणाऱ्या छोट्या छोट्या असंख्य कंपन्यांतून 'दिवाळीच्या विस्कटलेल्या रांगोळी'सारखा 'मराठी-संसारा'चा सारीपाट चौफेर उधळलेला रहातो!

## (लेख क्रमांक ७)

मराठी घरातील दिवाळी म्हणा, दिपावली म्हणा... हा नवचैतन्यानं सळसळणारा, नरकचतुर्दशीच्या पहाटेला उटण्याच्या दरवळणाऱ्या सुगंधाचं लेणं घेऊन येणारा अन् चकली, चिवडा, करंज्या (कानोले), रवा-बेसनाचे लाडू, अनारसे, शंकरपाळ्या वगैरे म राळाचा घमघमाट चारही दिशांनी उधळून देणारा 'दिपोत्सव'...दिवाळी रात्री वा पहाटेचं बाहेरचं वातावरण, पणत्यांच्या ज्योतींनी व कंदिलाच्या दिव्यांनी उजळवून टाकण्यापेक्षाही अधिक...वर्षभर, ''दिवाळीच्या मुळा, लेकी आसावली'', अशी दिवाळीची चातकासारखी वाट पहाणारी मराठी मनं उजळवून टाकायचा!

आता मात्र, गगनाला भिडलेल्या महागाईत फटाके लावताना फटाक्यांच्या किंमतींनी मराठी फाटक्या खिशातले हात कुठेतरी थरथरत असतात...फटाक्यांचा 'डेसिबल' आणि त्यांचं वैपुल्य, दिवाळीतल्या हवेच्या प्रदुषणाला फाट्यावर मारुन कमालीचं वाढत चाललंय. पण, ही दरवर्षी 'वाढणारी' आणि कानठळ्या बसेपर्यंत 'वाजणारी', जी फटाक्यांची 'समृद्धी'...महाराष्ट्रातल्या प्रमुख शहरांच्या (मुं.ठा.पु.रा. ना...मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक-नागपूर) रस्त्यांवर व गगनचुंबी गृहसंकुलातून (टॉवर्स) दृष्टिक्षेपात येत रहाते; तिचं अधिकांश नातं, 'गुजराथी-भाषिक' धनसमृद्धीशी असतं! मराठी कानांनी फक्त बहिरं व्हायचं आणि मराठी-फुफ्फुसांनी फटाक्यांच्या धुराची प्रदूषित हवा, दिवाळीत..पृष्ठ क्र. ७ वर

**'सॅमसंग' संपकरी......**पृष्ठ क्र. ६ वरुन

व दिवाळीनंतर हुंगत रहायची...आणि, दिवाळीचा बोनस चुटकीसरशी संपल्यानंतर मराठ्यांनी डोक्याला हात लावत, पुढच्या मासिक-हप्त्यांची चिंता करत बसायचं.

फटाक्यांच्या समृद्धीसोबतच आमच्या दगडाधोंड्यांच्या महाराष्ट्रदेशात समृद्धी-महामार्ग, सागरी-महामार्ग, बुलेट-ट्रेन वगैरे महाप्रकल्प येत रहातात; पण, ते येताना...गुजराथी व्यापारी, उद्योगपती, व्यावसायिक यांच्या आर्थिकहिताला प्रथम नजरेसमोर ठेऊन आणि 'सोद्या' ('सोदा', या ग्राम्य मराठी शब्दाचा अर्थ 'पक्का बदमाष') राजकारण्यांकरवी मराठी-जमिनींचे सौदे मांडूनच येतात!

मराठी कामगार-कर्मचारीवर्गाचा 'बोनस', ही एक 'बोगस' संकल्पना का बनलीय... तर, कंपन्यांचा 'CSR' वगैरे एकवेळ, कॉर्पोरेटीय-नफ्यावर आधारित असतो (अर्थात, कॉर्पोरेटीय CSR, हा स्वतःच एक मोठा भ्रष्टाचार आहे आणि ढोंगी 'हिंदुत्ववाद्यां'च्या देशभर जातधर्म-विद्वेष मै लावणाऱ्या विविध संस्थांना 'बरकत' आणणारा आहे, ते वेगळंच); पण, 'मराठी-बोनस' मात्र, त्या नफ्यावर आधारित कधि नसतोच.

...अलिकडची जी तरुण बुद्धिमंत बाळं कॉर्पोरेटीय-व्यवस्थापक (मॅनेजर्स) बनलीयत; ती मात्र, कंपन्या-कारखान्यांमधून कामगार-कर्मचारीवर्गाच्या (बहुशः, 'कंत्राटी-गुलाम' असलेला) हक्काच्या बोनसवर, पाकिटमाराच्या सफाईने डल्ला मारुन 'परफॉर्मन्स-बोनस' (Performance Bonus) या गोंडस नावाखाली दरवर्षी लाखो रुपये लाटताना-उकळताना सर्रास दिसतात...तरीही, ''राख एक वेळ पेट घेईल'' (Ash could be destined to burn), पण 'कंत्राटी-कामगार' नावाच्या 'गुलामां'च्या फौजांची विझलेली 'अस्मितेची ज्योत' आणि जातधर्माच्या; तसेच, बेगडी धार्मिकतेच्या व 'फाजिल-उत्सवप्रियते'च्या वर्षावाने झालेली ओलीचिंब मनं, काहीकेल्या पेटायला तयार नाहीत!

एक गुजराथी उद्योगपती, १०५ मराठी-बळी (ते ही प्रामुख्याने मराठी-कामगारांचेच) घेणाऱ्या आमच्या मुंबईत, आमच्या मराठी-नाकावर टिच्चून पाचदहा हजार कोटींचा बंगला काय बांधतो, शेकडो कोटी रुपये आपल्या पोराच्या लग्नात आमच्या नजरेसमोर काय उडवतो-उधळतो... आणि, आम्ही साले दळभद्री मराठी-कामगार, शहरांच्या विविध नगरांमधल्या 10' X 10' च्या कोंडवाड्यालाा पण महाग...???

खरंतरं, 'मराठी-दिवाळी'ला तोवरच अर्थ होता...तोवरच मराठी-दिवाळीला 'मराठी-संस्कृति'चा दरवळ होता; जोवर, महाराष्ट्रातली 'आर्थिक-विषमता' प्रमाणात होती!

आज कॉर्पोरेटीय क्षेत्रात उच्चतम वेतन (व्यवस्थापकीयवर्गाचं 'कमाल-वेतन'), हे निम्नतम वेतनाच्या (कंत्राटी कामगार-कर्मचारीवर्गाचं 'किमान-वेतन') हजारो पटीत जाऊन पोहोचलंय... भारतातील अमानुष 'आर्थिक-विषमता', 'खाउजा-धोरणा'पश्चात (खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण) गेल्या काही दशकांमध्ये पराकोटीची टिपेला पोहोचली असतानाच... स्वित्झर्लंडसारख्या अनेक पाश्चात्य प्रगत देशांमधील, मुळात मर्यादित असलेली 'आर्थिक-विषमता', गेल्या दोन दशकात अधिकच उतरणीला लागलीय...तिकडे, संयुक्त राष्ट्र संघाचं (युनो) ''समृद्धी सर्वांसाठी'' (Shared Prosperity) हे 'शाश्वत-विकासाच्या लक्ष्यां'पैकी (Sustainable Development Goals... SDGs) प्रमुख 'लक्ष्य', कटाक्षाने व पूर्णांशाने व्यवहारात उतरवलं गेलंय. तेथील, यच्चयावत सगळेच नागरिक समृद्धीचे केवळ किरकोळ 'लाभधारक' नव्हे (जशा, 'लाडकी-बहिण' योजनेअंतर्गत आपल्या वंचित मराठी-महिला, किंचित-लाभार्थी ठरतात) तर, हक्काचे 'भागधारक' असतात! मात्र, त्याच स्वित्झर्लंड देशातल्या बड्या कंपन्या, भारतात आपल्या कंपन्यांमधून, कायम-कामगारांची भरती रोखून त्यांच्या जागी 'कंत्राटी-गुलाम' वापरण्यासाठी, वाटेल त्या थराला जाताना दिसतात... याचं प्रमुख कारण, आपल्या देशातले भांडवली-व्यवस्थेचे 'दलाल' बनलेले तद्दन प्रस्थापित राजकारणी-राजकीय पक्ष, भ्रष्टाचाराला सोकावलेला बुभुक्षित सरकारी अधिकारीवर्ग आणि नीतिशून्य-भेकड बनत चाललेला कामगार-कर्मचारीवर्ग!

आमची मराठी-गरीबी, मनाने खरोखरीच श्रीमंत होती...फराळाची ताटं, चाळीचाळींतून-वाड्यावाड्यांतून घरोघरी फिरताना आणि जातधर्म-आर्थिकस्तराचा मागमूस नसलेली सगळी लहान मुलं, मोजकेच फटाके चारपाच दिवस पुरवून पुरवून (त्यात लवंगी आणि डांगी माळा, सुट्या करुन एकेक फटाका काटकसरीने वाजवला जायचा) एकत्र येऊन वाजवताना, ती मराठी मनांची श्रीमंती प्रत्यक्षात साकार व्हायची. ते सगळंच वातावरण, अक्षरशः मंतरलेलं किंवा त्याही पलिकडचं म्हणजे, दिवाळीची अशी खास 'झिंग' आणत, शरीराच्या आणि मनाच्या रंध्रारंध्रातून...भिनणारं असायचं!

...पण, आता सगळंच बदललंय. काळानं कूस जरुर बदलावी, पण ती अशी एवढी वेडीवाकडी बदलावी? ज्या महाराष्ट्राच्या लालकाळ्या मुशीत, ही मायमराठी माणसं पिढ्यानपिढ्या जगली...त्यांचीच काळानं 'माती' करावी??

उत्तरपूर्वेतून यूपीवाले अन् बिहारी आणि उत्तरपश्चिमेतून जैन-गुज्जू-मारवाडी-सिंधी-पंजाबी...अशा सगळ्याच परप्रांतीयांच्या चौफेर आक्रमणातून, 'मराठी-श्वास' कोंडत गेला आणि इथल्या नादान मराठी-राजकारण्यांमुळे 'भांडवली-व्यवस्थे'च्या कैचीत सापडला!

...म्हणूनच आता, तथाकथित 'लाडक्या बहिणी', नाममात्र 'दिड हजारी ओवाळणी'ची दर महिन्याला आससून वाट बघत बसतात, ज्यातून संसाराच्या फाटक्या गोधडीला एखाददुसरा टाका घातल्याखेरीज फारसं काही हाती लागण्यासारखं नसतं... नवरा आपला 'कंत्राटी-कामगार' असलेल्या असंख्य मराठी-महिला, अगदी नाईलाजास्तव 'रिक्षाचालक' बनलेल्या रस्तोरस्ती दिसतात... मराठी हताशा आणि दैन्य, पराकोटीला पोहोचल्याचं, हे दुश्चिन्ह आहे!

सरकारी GR नुसार या लाडक्या बहिणींच्या (गरीब महिलांच्या) रक्तातील हिमोग्लोबीनचं घटत प्रमाण वाढवून त्यांचा निमिया (Anaemia) नियंत्रणात आणणे, त्यांची रोजगार-क्षमता वाढवून त्यांना स्वावलंबी करणे... एवढी सगळी कथित उद्दिष्टे, 'दिडदमडी'च्या ओवाळणीने, अंशाने तरी साध्य होण्यासारखी आहेत?

...या अस्वस्थ करुन सोडणाऱ्या पार्श्वभूमीवर, आपलं 'मराठी-साजरेपण'...मग, ते सणांचं असो, सोहळ्यांचं असो वा असो उत्सवांचं...एक 'सामाजिक-अपराध' बनू पहातंय... आणि, म्हणूनच, "Ash is burning" चा मराठी-प्रत्यय कधि येतो, तेच पहात रहायचं....

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष) (क्रमशः)



''वेडसर अमेरिकनांचा, वेडसर अमेरिकनांकडून, वेडसर अमेरिकनांसाठी...निवडला गेलेला 'वेडसर' अध्यक्ष'', असं ज्या निवडणुकीचं एका वाक्यात वर्णन करता येईल; अशा 'अंकल सॅम'च्या नुकत्याच लागलेल्या निवडणूक-निकालानंतर तर, भांडवली-व्यवस्थेसंदर्भातील अनेक गंभीर प्रश्न आता सातत्याने ऐरणीवर येत राहतील. ८ वर्षांपूर्वी 'अमेरिका फर्स्ट', हे अमेरिकेची ताकद, सुरक्षा व वर्चस्व जगभरात अव्वल नंबरवर राखण्याबाबतचं वक्तव्य करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प नावाच्या अब्जाधीश उद्योगपतीची, याहीवेळेस प्रचारात जवळपास तिचं भाषा होती...फरक, एवढाच होता की, याखेपेस त्याच्यासोबत एलिऑन मस्क नावाचा एक अत्यंत बुद्धिमान; पण, वेडसर-विक्षिप्त उद्योगपती, आपल्या धंद्या-व्यवसायाचं जगभरातील वर्चस्व कायम राखण्यासाठी, त्यांच्यामागे ठाम उभा होता!

*...दि. ०७ नोव्हेंबर-२०२४ रोजीचं **राजन राजे**, अध्यक्ष-धर्मराज्य पक्ष, यांचं व्हॉटस्पवरचं STATUS*

# निसटलेला "आनंद" मिळवण्यासाठी

सध्याचे दिवस सणासुदीचे. हळुहळु मार्केटमध्ये ग्राहकांची गर्दी वाढत आहे. कशासाठी? फक्त वस्तुंसाठी? नाही . वस्तू तर फक्त एक माध्यम आहे

काही वर्षांपूर्वी मार्केटने लोकांना सांगितले, सतत हॅमर केले "खूप खरेदी केली की, खूप आनंद मिळतो".

कोट्यवधी नागरिकांनी पिढ्यानपिढ्या आर्थिक विवंचनेत काढलेल्या; या अनादी भुकेल्या कोट्यवधी नागरिकांना वाटले की "मार्केट" तर अगदी आपल्या मनातलंच सांगतय...

लोकांना खरतर पोचायचे असते "आनंदा"च्या गावाला; ते त्यांच्या डीएनए मध्ये प्रोग्रॅम्ड आहे; आनंदाच्या गावाला पोचणे, मनमुराद आनंद हेच तर जीवनाचे इप्सित आहे.

मार्केटने या भौतिक वांचितावस्थेचा, मानसिकतेचा अभ्यास करून "आनंद" म्हणजेच जास्तीत जास्त खरेदी असे समीकरण हॅमर केले. ते नैतिक, साधी राहणी, लेक्चर बाजी करून जाणारे नाही.

असो

**मग मार्केटने शासनाच्या धोरणकर्त्यांच्या/टाऊन प्लॅनर्सच्या मदतीने "आनंदा"च्या गावाला पोचणारा रस्ता नेहमीच बाजारपेठेतून जाईल अशी आखणी केली; आनंदाच्या गावाला पोचण्यासाठी दुसरा रस्ताच नाही ठेवला बाजारपेठेचा रस्ता होता मायावी; चालता चालता कोणीतरी अदृश्य शक्ती रस्त्यावरून जाणाऱ्याना हाताला घेऊन बाजारपेठातील कोणत्या तरी दुकानात घेऊन जात असते.**

**खरेदी करायचे ठरवले नसतांना लोक अगदी नको असणाऱ्या गोष्टी खरेदी करून दुकानातून बाहेर पडत असतात, लोक दुकानदारांना विचारत असतात "का हो, या खरेदीवर 'आनंद' मिळणार होता ना फ्री?"**

**दुकानदार हसून म्हणतात 'हो टाकलाय ना पॅकिंगच्या आत'**

पण हवे तेव्हढे लोक मार्केटमध्ये येईनात.

त्याचे कारण पुन्हा मार्केटच होते. मार्केट पुरेसे रोजगार निर्माण करत नव्हते. पुरेसे वेतन देत नव्हते; सगळे काही स्वतःच बनवत असल्यामुळे स्वयंरोजगार होत नव्हते. त्यामुळे लोकांकडे वस्तूंच्या खरेदीसाठी हवे तेव्हढे पैसेच नव्हते.

मग मार्केटने बँका, स्मॉल बँका, क्रेडिट कार्ड कंपन्या, मायक्रो फायनान्स, सूक्ष्म वित्त, गोल्ड लोन, बाय नाऊ पे लेटर, विना तारण, विना कारण, डिजिटल लेंडींग.कामाला लावल्या; जगभरातून भांडवल वाहत येऊ लागले.

आता तर मार्केटने शासनाला सांगून लाडक्या बहीण, भावांच्या नावाखाली डायरेक्ट कॅश द्यायला लावली आहे.

**लोक खरेदी करताहेत; बचतीची सवय गटारात फेकून दिली आहे. मिळेल तेथून कर्ज ओराबडताहेत. मग अनेक महिने/अनेक वर्षे ती कर्जे फेडताहेत. ईएमआय ला पैसै नाहीत तर कर्ज फेडण्यासाठी नवीन कर्ज काढत आहेत.**



कर्ज देणाऱ्या संस्थांकडे एवढे भांडवल वाहत येत आहे. की कर्ज घेणाऱ्या पेक्षा कर्ज देणाऱ्यांचा उत्साह जास्त आहे.

**आपल्या हातातल्या पिशवीत त्या पॅकेट्च्या आत दुकानदाराने "आनंद"देखील पॅक केलं आहे, याच आनंदात लोक आपापल्या घरी पोचताहेत, पॅकिंग उघडताहेत, नवीन वस्तुमालाला हुंगताहेत, चव घेताहेत, स्पर्श करताहेत, त्यांना छान वाटतंय. शेवटी "आनंद" आपल्या घरात आलाय याच धुंदीत लोक असतांना ......**

विक्रमादित्याच्या खांद्यावरून निसटून जंगलात झाडावर जाऊन लटकणाऱ्या त्या प्रेतासारखा "आनंद" लोकांच्या घरातून निसटून परत परत बाजारपेठेतील दुकानात जाऊन लटकत आहे !

त्याचा डाव सफल येत आहेत. कारण आनंदाला शोधत, लोक परत परत बाजारात, दुकानांत जात आहेत. अजून वेगवेगळ्या वस्तू विकत घेत आहेत.

निसटलेला तो "आनंद" मिळवण्यासाठी... *(समाजमाध्यमातून साभार)*



*...जाणिवपूर्वक फक्त उद्धवजींचीच बॅग तपासली जाणं (लोकसभा-निवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या हेलिकॉप्टरमधून आणल्या गेलेल्या काळ्या बॅगा वेळीच तपासल्या गेल्या नाहीतच...तर, मोदी-शहांच्या बॅगा काय तपासणार हे?) हा महाराष्ट्राचा अपमान आहे... सर्वच राजकीय नेत्यांच्या बॅगा अशाच पद्धतीने नीट तपासल्या जाणार असतील; तर, प्रश्नच नव्हता! पण, 'महाराष्ट्रधर्म बुडवणाऱ्या गद्दारां'ना आपल्या ताटाखालची पोकळ सत्ताधारी मांजरं बनवणाऱ्या 'गुजराथी-लॉबी'नेच घडवलेला, हा संतापजनक व अश्लाघ्य प्रकार आहे...याचा, आम्ही 'धर्मराज्य पक्षा'तर्फे तीव्र शब्दात निषेध करतो... "सिंधुदुर्गी शिवरायांचा तकलादू पुतळा उभारुन" समस्त महाराष्ट्राच्या केल्या गेलेल्या अपमानाच्याच श्रेणीतला, हा महाराष्ट्राचा घनघोर अवमान आहे आणि तो सहजी विसरला जाणार नाही...मराठी-जनमानसातीलत्या संतप्त पडसादांचं प्रत्यंतर, तर दिसेलच; पण, त्याहीपलिकडे जाऊन ते 'पडसाद', महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उमटतील...न उमटतील, तर तो महाराष्ट्र कसला...???*

**...राजन राजे**

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# सर्व गोष्टीला मुसलमानच जबाबदार आहेत का ?

बोगस आणि बकवास भाकडकथा रचून लोकांना मूर्ख बनवणारे या प्रश्नांची तर्कसंगत उत्तरे देऊ शकतील का?

**देवधर्माच्या आड दडून समाजाला कुठवर लुटायचे, फसवायचे? त्यांचे मानसिक, आर्थिक, प्रसंगी शारीरिक शोषणही कुठवर करायचे? रोज नव्याचा शोध घेणाऱ्या जगाने ही हरामखोरी उघडी पाडली आहे. अशा षडयंत्राच्या जोरावर समाजावर सत्ता गाजवणाऱ्या लोकांची मुस्काडं विज्ञानाने मोडली आहेत. तरीही त्यांचा तोच तोच खेळ सुरु आहे.**

- १२ व्या व १३ व्या शतकाआधी म्हणजेच मुसलमान भारतात यायच्या आधी भारतातील बहुजन अर्थात एससी, एसटी, व्हीजे, एनटी, ओबीसी म्हणजे माळी, तेली, कुणबी, मराठा आणि इतर अठरापगड तथाकथित जातींमध्ये विभागलेल्यांचा शत्रू कोण होता?
- मुसलमान यायच्या आधीचा इतिहास पाच हजार वर्षांचा आहे. आपला बहुजन राजा हिरणाक्ष, हिरण्यकश्यपू, बळीराजा, महात्मा चार्वाक, सिद्धार्थ गौतम, वर्धमान महावीर यांचा संघर्ष कोणा विरुद्ध होता?
- जगाला शांती आणि समतेचा संदेश देणाऱ्या बौद्ध भिक्खूंच्या कत्तली करून, बौद्ध विहारे उद्ध्वस्त करणारे मुसलमान होते का?
- हिंदू धर्मामध्ये वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था मुसलमानांनी निर्माण केली आहे का?
- कुणबी-मराठ्यांपासून ते सफाई कर्मचाऱ्यांपर्यंतच्या अर्थात, हिंदूंच्या पवित्र मानल्या जाणाऱ्या धर्मग्रंथांनुसार शूद्रांपासून ते अति शूद्रांपर्यंतच्या अठरापगड जातींतील लोकांच्या आणि समस्त स्त्रियांच्या शिक्षणावर बंदी घालून शतकानुशतके त्यांचा सर्वांगीण विकास रोखून धरणारे मुसलमान होते का?
- चक्रधर, बसवेश्वर, नामदेव, ज्ञानेश्वर, कबीर, रवीदास, तुकाराम यांसारख्या संत-महात्म्यांचा अतोनात छळ करुन आणि त्यांच्या हत्या करवून त्यांच्यापैकी कुणी जिवंत समाधी घेतली, तर कुणी सदेह वैकुंठाला गेले असल्या थापा मारणारे मुसलमान होते का?
- ज्या संत नामदेवांचे महाराष्ट्रातून पंजाबमध्ये-'गुरुग्रंथसाहेबा'मध्ये साठ-बासष्ट अभंग नोंदवले गेले, ते संत नामदेव जेव्हा महाराष्ट्रातील एका देवळापुढे कीर्तन करीत असतात, तेव्हा शूद्राला देवळापुढे कीर्तन करता येणार नाही, देवळाच्या पाठीमागे जाऊन तू कीर्तन कर अशी ताकीद देणारे आणि त्यांना देवळासमोरून हुसकावून लावणारे मुसलमान होते का?
- नीतीनं वागणं हा खरा धर्म आहे. माणूसकीनं वागणं हा खरा धर्म आहे. रंजल्या-गांजल्या लोकांना जवळ करणं हा धर्म आहे, त्यामध्ये परमेश्वर आहे, त्यामध्ये साधुत्व आहे. इतका नैतिक धर्म सांगणाऱ्या, धर्माविषयी काहीतरी चांगलं मांडणाऱ्या जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या गाथा इंद्रायणी नदीत बुडवून तुकोबारायांची हत्या करणारे आणि ते सदेह वैकुंठाला गेल्याची आवई उठविणारे मुसलमान होते का?
- शूद्र म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला मुसलमानांनी विरोध केला होता का?
- छत्रपती शिवरायांवर पहिला वार करणारा कृष्णा भास्कर कुलकर्णी हा मुसलमान होता का?
- छत्रपती शंभुराजांचे विरोधात एकदा नव्हे, तर अनेक वेळा कपट-कारस्थान रचून त्यांना उद्ध्वस्त करण्याचा कुटिल डाव आखणारे मुसलमान होते का?
- छत्रपती शिवराय आणि शंभुराजांवर विषप्रयोग करणारे मुसलमान होते का?
- स्त्रिया आणि अठरापगड जातींमध्ये विखुरलेल्या अलुतेदार-बलुतेदार बहुजनांच्या सर्व प्रकारच्या दुःखाचे, दारिद्र्याचे मूळ कारण शिक्षणाचा अभाव असल्याचे जाणून शिक्षण सर्वसामान्य लोकांच्या दारापर्यंत पोचावे यासाठी जिवाचे रान करणाऱ्या क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुलेंना विरोध करणारे आणि त्यांची हत्या करण्यासाठी त्यांच्यावर मारेकरी पाठवणारे मुसलमान होते का?
- बहुजनांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या पहिल्या शिक्षिका, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुलेंवर शेण, दगड, चिखलमाती मेकून त्यांना छळणारे मुसलमान होते का?
- नोकऱ्यांमध्ये असलेली ब्राह्मणांची मक्तेदारी मोडीत काढून स्वतःच्या राज्यात बहुजनांना सर्वप्रथम नोकऱ्यांची संधी देणारे, आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराजांची बदनामी करणारे आणि 'शूद्रांचा राजा' म्हणून छत्रपती शाहू महाराजांची टिंगलटवाळी करणारे मुसलमान होते का?
- कथा-कादंबऱ्या, भाकडकथा, नाटक-चित्रपट, छद्मी इतिहास यांच्या माध्यमातून राजमाता मॉसाहेब जिजाऊ, छत्रपती शिवराय आणि शंभू राजांचे हेतुपुरस्सर चारित्र्यहनन करणारे आणि त्यांची बदनामी करणारे मुसलमान होते का? आहेत का?
- क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले, छत्रपती शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी, समतावादी चळवळीला विरोध करणारे आणि त्यांची टिंगलटवाळी करणारे, त्यांना छळणारे मुसलमान होते का?
- बहुजन एससी, एसटी व ओबीसी व मराठ्यांच्या न्याय्य हक्कांना आणि त्यांच्या आरक्षणाला विरोध करणारे मुसलमान आहेत का?
- ओबीसींच्या जनगणनेला मुसलमान विरोध करतात का?
- न्यायालय, मंत्रालय, सीबीआय, ईडी, निवडणूक आयोग, तसेच राज्य व केंद्रीय प्रशासनाच्या इतर विविध विभागांतील बहुजनांच्या अर्थात एससी, एसटी, ओबीसी, मराठ्यांच्या वाट्याला येणाऱ्या न्यायाधीश, राजदूत, सचिव दर्जाच्या अति उच्चपदस्थ जागा मुसलमान बळकावून बसले आहेत का?




- देशातील अठरापगड जातींमध्ये विभागलेल्या बहुजन शेतकरी-शेतमजूर, कामगारांचे शोषण करणारे मुसलमान आहेत का?

**असे बरेच प्रश्न विचारता येऊ शकतात. परंतु, सुशिक्षित आणि सद्सद्विवेकबुद्धी असणारे लोक या सगळ्या प्रश्नांची उत्तरे न विचारता, सध्या देशात धार्मिक उन्माद निर्माण करणाऱ्यांच्या हातचे बाहुले बनले आहेत. सध्या अशा जातीवादी, खुनशी व गुंड प्रवृत्तीच्या लोकांच्या हाती देशाची सूत्रे एकवटली आहेत. परिणामी, देशाचा विकास थांबून देश किमान शंभर वर्षे मागे गेला आहे. हे सर्व पाहता शेवटी या देशाचे पुढे काय होणार असा प्रश्न किमान बुद्धिमान व्यक्तींना ज्या दिवशी पडेल आणि ते वर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ज्या दिवशी विचारणे सुरु करतील, ज्या दिवशी ते राजकारणाच्या गुढघ्यातून मान बाहेर काढून या प्रश्नांकडे पाहतील त्या दिवशी सभोवतालचे सत्य त्यांना दिसेल...तोच परिवर्तनाचा दिवस समजावा!**

*(समाजमाध्यमातून साभार...)*

# जबाबदार लोकशाहीचं जाज्वल्य वास्तव!

**कालची लोकसभेची काय किंवा आजची महाराष्ट्र–विधानसभेची काय...दोन्ही निवडणुका; तसेच, देशाच्या इतर राज्यांतील निवडणुका, या कमालीच्या विषम पातळीवरील लढती होत्या व आहेत....**

**लोकसभा–निवडणुकीनंतर जर, दुसऱ्या क्रमांकाचं महत्त्व कशाला असेल; तर ते आहे, महाराष्ट्राच्या विधानसभा–निवडणुकीला! अमेरिकेत न्यूयॉर्कचं, जे राजधानी 'वॉशिंग्टन'पेक्षाही मोठं असं अनन्यसाधारण महत्त्व...तेच, मुंबई–महाराष्ट्राचं दिल्लीहूनही कितीतरी पटीने अधिक महत्त्व...म्हणूनच, 'गुजराथ–नागपूर' परिवारातल्या 'वासवी'भांडवली– 'संघ'शक्ति एकत्र येऊन (हा ही एक 'सांघिक–प्रयोग'च) मुंबई–महाराष्ट्राचा घास घेऊ पहातायत.**




अशा समरप्रसंगी, मराठी–आत्मसन्मानाला साद घालत...मतं विकत घेऊ पहाणाऱ्या व त्याकामी पाण्यासारख्या वहाणाऱ्या काळ्यापैशाला लाथ मारुन झुगारुन देणं, नितांत गरजेचं आहे.

**''ही न्यायव्यवस्था काहींकांची रखेल झाली... ही संसददेखील हिजड्यांची हवेली झाली'', ...अशा जळजळीत शब्दांत वस्तुस्थिती मांडणाऱ्या लोकशाहीर अणाभाऊ साठेंचा पदोपदी 'आठव' (त्या 'दामदास' आठवलेंचा मात्र, अजिबात नकोच) व्हावा...अशी भयावह परिस्थिती देशभरात आजमितीस मौजूद असताना होणारं, आजचं महाराष्ट्र–विधानसभेचं मतदान हे...१२ करोड नव्हे; तर, १२० करोड मोलाचं 'मतदान' होय!**

संपूर्ण भारतभर विद्वेषाचा विखार पसरवत 'जातधर्मीय–ध्रुवीकरणा'च्या काळ्या पडद्याआडून,

- अत्यंत महागड्या, लुटेऱ्या खाजगी–शिक्षणाद्वारे शिक्षणक्षेत्रात नवी 'चातुर्वर्ण्य–व्यवस्था' उभी करणाऱ्या....
- ४ काळ्या कामगार–कायद्यांनी बनलेली 'काळी कामगार–संहिता' (Black Labour-Code) लादणाऱ्या; तसेच, 'कंत्राटी–कामगार पद्धती'द्वारे 'निळ्या कॉलर'वाल्या तमाम कष्टकऱ्यांना (व आता तर, 'पांढऱ्या कॉलर'वाल्या सुशिक्षित पांढरपेशांना देखील) 'गुलामगिरी व नव–अस्पृश्यते'त ढकलणाऱ्या....
- शेतकऱ्यांवर ३ काळे कायदे लादू पहाण्याचा अघोर प्रयोग करुन थकलेल्या (व त्यासाठी पुन्हा, योग्य संधिची वाट पहात 'दबा' धरुन बसलेल्या) व अजूनही शेतकऱ्यांना सन्मानजनक 'किमान हमी भाव' (Minimum Support Price...MSP) नाकारणाऱ्या....
- गोरगरीब मराठी स्त्रियांवर 'गुलाबी रिक्षा'वाली व 'दीड हजार'वाली 'गुलामी' लादून, त्यांना जगण्याचा सन्मान नाकारणाऱ्या. ..'बदलापूर–घटने'सारख्या असंख्य घटनांतून महिला–बालिकांची सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या....
- निरंकुश भ्रष्टाचारातून मालवणातील शिवछत्रपतींचा तकलादू पुतळा उभारणाऱ्या....
- 'नागरिकत्व' अथवा 'प्रजासत्ताकत्व' (म्हणूनच तर आपण २६ जानेवारीला 'प्रजासत्ताक दिन', हा १५ ऑगस्ट या 'स्वातंत्र्यदिना'हून वेगळा असा दिन साजरा करतो) म्हणजे, ''जगण्याचे मूलभूत हक्क–अधिकार प्रत्येक भारतीय–नागरिकाला देण्याची 'घटनादत्त' हमी, असं असताना देखील...अल्पसंख्याक समाजाच्या व्यक्तिंच्या जगण्यात 'अस्थिरता व असुरक्षितता' निर्माण करणाऱ्या व त्यांचे माणुसपणाचे हक्क धोक्यात आणणाऱ्या....
- म. गांधींनी 'दरिद्री' माणसाला 'दरिद्री–नारायण' आणि अस्पृश्यांना 'हरिजन' कल्पून... त्यांच्या जगण्यातल्या सन्मानाला आश्वस्त केलं असताना; त्यांना अठराविश्व दारिद्र्यात ढकलू पहाणारी 'रक्तपिपासू–निर्मम–शोषक'व्यवस्था (Vampire-State System) देशभरात (विशेषतः, महाराष्ट्रभरात) घट्ट रुजवणाऱ्या....
- सहकारी महिला कर्मचाऱ्याच्या लैंगिक–छळ प्रकरणात आरोपित 'रंजन गोगोई' तर सोडाच; पण, 'चंद्रचूड'सारख्या...''लोकशाहीची व राज्यघटनेची 'संरक्षक'मानल्या जाणाऱ्या'' न्याय–व्यवस्थेच्या बुडालाच 'चूड' लावणाऱ्या, अनेकोनेक न्यायाधीशांची पैदास करणाऱ्या....
- शिवबा–संतांचा, शाहू–फुले–आंबेडकरांचा 'महाराष्ट्रधर्म', 'मैल्या गंगे'त बुडवणाऱ्या....

भांडवली–डाकू, लुटेरे, दरोडेखोरांच्या आणि 'रेशीमबागवानी' कपटकारस्थानी प्रवृत्तींच्या हाती, आपण आपला महाराष्ट्र सोपवणार आहोत काय?

...याचा, महाराष्ट्रीय सुबुद्ध मतदारांनी गंभीर होऊन आजच विचार करायचाय!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतावादी समाज–संरचनेत, निखळ 'लोकशाही'ला सर्वाधिक मौलिक स्थान आहे व असणारच...त्यालाच, आज ग्रहण लागलंय.

**''जबाबदार लोकशाही म्हणजे प्रत्येक जबाबदार नागरिकाचं, जबाबदारीने टाकलं गेलेलं मत (कुठल्याही आमिषाला वा दडपणाला बळी न जाता) आणि एका मताला एक मूल्य''... ही धारणा, जाज्वल्य 'जनवादी' आहे!**

**इथे मुद्दाम लक्षात घेतलं गेलं पाहिजे की, देशाला स्वातंत्र्याची आस लागलेली असताना व 'प्रत्येक नागरिकाला एक मत व एका मताचं एक मूल्य' अशी मतदानाधारित लोकशाही, देशात अवतरत असतानाच...हाच 'संघ–परिवार' मतदारयाद्या बनवण्याच्या प्रक्रियेदरम्यान सरकारला पत्र लिहून ''केवळ, २५ वर्षांवरील पदवीधर 'पुरुषा'लाच (म्हणजे, आपसूकच स्त्रियांना नव्हेच) मतदानाचा अधिकार असायला हवा'', अशी भयंकर समाजघातकी–लोकशाहीविरोधी मागणी करीत होता, हे कितीजणांना ज्ञात आहे?**

तेव्हा, लोकशाही जिवंत ठेऊन 'प्रजासत्ताक'वादी धारणा चिरायू ठेवायच्या असतील; तर 'आज' आपण नेमकी कोणाची निवड करतोय...ते 'उद्यानंतरच्या उद्या'साठी, पुन्हा एकवार 'लोकशाही–स्वातंत्र्या'च्या उद्घोषासाठी, मराठी–नवोन्मेषाच्या 'उदया'साठीही महत्त्वाचं ठरणार आहे...!!!

***''ले 'मशालें' चल पड़े हैं लोग मेरे गाँव के ।***
***अब अँधेरा जीत लेंगे लोग मेरे गाँव के ।।''***
***।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।***

(संयुक्त–महाराष्ट्रानंतर आता, 'स्वायत्त–महाराष्ट्र'... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त–महाराष्ट्र'... 'शिवछत्रपती–राष्ट्र'!)

***...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

**आमचं, माधवी बूचच्या 'सेबी'चं घोडं, 'अदानी'ची पेंड खात असताना आणि जागतिक भांडवली-व्यवस्था, भारतीय भांडवली-व्यवस्थेची लक्तरं काढत असताना....कृपया वाचा, खालील 'चांदोरकरी'**

**...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

# 'अदानी'च्या निमित्ताने : देशांतर्गत नव्हे, देशाबाहेरील 'स्टेकहोल्डर्स' पर्दाफाश करत आहेत....

कॉर्पोरेट-क्षेत्रातील बड्या धेंडांच्या नोकरशहा, बँकर्स, राजकारणी यांच्या बरोबरच्या साट्यालोट्यातून मोठी कंत्राटे, हव्या त्या योजना, कर कपात, अर्थसंकल्पीय तरतुदी, कर्जमाफी, नवीन कायदे किंवा कायद्यात सुधारणा. हे कमीजास्त प्रमाणात होत होते

**पण, काही लोकलज्जा होती... टीका झाली, प्रकरण बाहेर आले की, काहीबाही कृती-कारवाई व्हायची. किमान जे काही केले गेले त्याचे नागडे सार्वजनिक समर्थन किंवा त्याला 'राष्ट्रवादा'चा बेगडी मुलामा वगैरे नव्हता चढवला जात!**

**अदानीचा 'क्रोनिझम' म्हणूनच वेगळा आहे. त्यात ''जा, क्या करना है कर ले; तू मेरा कुछ बिगाड नाही सकता'', अशी मस्तवाल घमेंड आहे...सगळी सिस्टीम 'फिक्सड' आहे.**

**सगळे काही समोर घडतेय. टीका, सोशल मीडिया, इन्व्हेस्टिगेटिव्ह जर्नालिझम, मोर्चे, अगदी संसदेतील विरोधकांचा आक्रमकपणा कशाचीही दखलच घेतली जात नाही... प्रचंड हताशा जाणवतेय.**

क्रोनिझम कारभाराबद्दल प्रचंड टीका होत असते; हा क्रोनिझम संपावा इच्छा असते, पण कसा ?

सत्ताधारी प्रवक्ते तुम्ही फक्त टीका करता, कोर्टात जा म्हणतात. प्रस्थापित व्यवस्था एवढी घट्ट विणलेली असते की, त्यांच्यापैकी कोणीतरी फुटून निघाल्याशिवाय बाहेरच्या कोणाला काहीही थांगपत्ता लागत नसतोच. तो फुटून निघालेला काही नैतिक-भूमिकेतून ते करत नाही. वाट्यात भांडणे होतात, इगोचे इश्यू होतात, एखादा नोकरशहा कागदे लीक करतो इत्यादी.

दुसऱ्या शब्दात प्रस्थापित व्यवस्थेतील 'स्टेकहोल्डर्स'मध्ये कोणत्याही कारणाने राडा होणे गरजेचे आहे

स्टेकहोल्डर्स ज्यावेळी पूर्णपणे देशातीलच असतात; त्यावेळी, त्यांच्यापैकी कोणी आवाज करणार नाही; याची पद्धतशीर तजवीज केली गेली आहे. त्या स्टेकहोल्डर्सना देखील इथेच जगायचे, मारायचे असते.

पण ज्यावेळी स्टेकहोल्डर परकीय असतो, त्याला येथील प्रचलित राजवटीची फिकीर नसते. ना येथील कायदे , तपास यंत्रणा त्याच्या वर डोळे वटारु शकतात, त्यांचा स्वतःचा काही अजेंडा असतो

आणि कॉर्पोरेट भांडवलशाहीच्या जागतिकीकरणात एक्झॅक्ट्ली हे घडते आहे. भारतीय कॉर्पोरेट फक्त भारतात पुरती मर्यादित होती. त्यावेळी नियमवही बनवणारे, अंपायर, अपील सारे काही मॅनेजेबल होते.

**जशा भारतीय मोठ्या भांडवलाच्या महत्त्वाकांक्षा त्यांना जागतिक पार्टनर बरोबर संसार करायला भाग पाडू लागल्या...त्या प्रमाणात, नवीन नियमवही, पारदर्शकता, कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या वेगळ्या संकल्पना अशी शस्त्रे घेऊन त्यांचे परकीय पार्टनर्स त्यांच्यावर चालून येऊ लागले.**

अदानीचे दोन मोठे भांडाफोड, हिडेनबर्ग आणि अमेरिकेन नियामक मंडळ, दोन्ही भारताबाहेरील आहेत...हा काही योगायोग नव्हे. आणि या एजन्सीज भारतातील अर्थव्यवहार अधिक पारदर्शी व्हावेत म्हणून या गोष्टी करत नाहीत. त्यांच्या वित्तीय, कायदेविषयक व आर्थिक हितसंबंधासाठी करतात.

गेली काही वर्षे भारतीय कंपन्यात गुंतवणूक करु पाहणारे परकीय गुंतवणूकदारच... भारतीय कंपन्यांतील क्रोनिझम/अपारदर्शीपणा/बेकायदेशीरपणा/मनमानी कारभाराविरुद्ध आवाज उठवत आहेत; अशी काही ठळक उदाहरणे.

रॅनबॅक्सीच्या सिंग भावांना जपानच्या दाईची/Daiichi ने वठणीवर आणले, मुकेश अंबानींच्या फ्युचर/Future ग्रुपमधील हस्तक्षेपाला अमेझॉनचा बेझोसने आव्हान दिले होते/धाकल्या अंबानींच्या रिलायन्स इंफ्राटेलमधील लपवाछपवीला चीनच्या मोठ्या बँकांनी NCLT मध्ये खेचले होते, झी मीडियाच्या सर्वेसर्वा सुभाष गोयलच्या नाकात Invesco या गुंतवणूकदार गटाने दम आणला होता.

लक्षात घ्या... यात बरोबर कोण, चूक कोण हा मुद्दा नाही ; कोण कोणाला भिडत आहे हा आहे... हे प्रस्थपित कॉर्पोरेट-भांडवलशाहीमधील अंतर्गत ताणतणाव आहेत.

जागतिक कॉर्पोरेट-भांडवलशाही प्रणाली अतिशय गुंतागुंतीची आहे. वरील सिच्युएशन्समध्ये सरकार दरबारी मि क्सिंग करुन/आपापल्या कंपन्यात मनमानी कारभार करणाऱ्या भारतातील प्रवर्तकांना वठणीवर आणणारे कोणीतरी भेटले, याचा आनंद मानायचा की, हे वठणीवर आणणारे महाकाय परकीय-भांडवल उद्या भारताच्या तंबूत शिरलेल्या उंटासारखे सिद्ध होईल, याची चिंता वहायची ?

प्रश्न गुंतागुंतीचे आहेत; त्यांना काळ्या पांढऱ्यात उत्तरे नाहीत, हे नक्की.

***...संजीव चांदोरकर***

---

**...राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, ''कुत्र्याच्या अंगावर भगव्याची छटा ।। गाढवाच्या अंगा नाही भस्माचा तोटा ।।'' तेव्हा, फक्त, ''भगवे कपडे घालून कोणी 'योगी' बनत नाही''...स्वतःच्या राज्यात उपाशी मरणारा अर्धाअधिक यूपी, महाराष्ट्रात पोट भरायला पाठवायची मर्दुमकी करणारे म्हणताहेत, ''बटेंगे तो कटेंगे'' आणि संघटितरित्या महाराष्ट्राची ७५% संपत्ती-धनसंपदा लुटून बसलेले व आता पैशाच्या आणि सत्तेच्या मस्तीत मराठी माणसांना आपल्या सोसायटीत बेधडक घरं नाकारणारी 'गुजराथी-लॉबी' म्हणतेय ''एक है, तो सेफ है''!**

...असले भुक्कड नारे देणारे, हे नामर्द-डरपोक लोक... केंद्रात-राज्यात 'डबल'च नव्हे; तर, 'ट्रिपल' इंजिन लावून बंदुकीच्या गराड्यात बसलेले असताना देखील जर, यांची खाली 'पिवळी' होत असेल; तर, हे काय कामाचे? आम्हाला नाही ती कधि कुणाची भिती वाटली?? कारण, आम्ही 'महाराष्ट्रा'चेच नव्हे, तर, 'स्वायत्त शिवछत्रपती-राष्ट्रा'चे मर्द मावळे आहोत...त्यामुळे, ''अंगावर येणारा, कोणीही असो; त्याला शिंगावर घेण्याची'' हिंमत आणि रग, सदैव वहाते आहे आमच्या धमन्यांतून!

**...केवळ, 'मुसलमान' शब्दाच्या पांगुळगाड्यावर राजकारणात 'मसलमॅन' बनलेले संघी-भाजपाई लोक...खऱ्याअर्थाने, 'देशद्रोही' आहेत! ''न खाऊंगा, न खाने दूंगा'', अशी नौटंकी करत यांनी अदानी-अंबानीसारख्या मोजक्या गुजराथी-भाषिक भांडवलदारांना, अवघा देश लुटण्यास मोकळीक दिली...नव्हे,** त्या अभद्र-समाजघातकी कामी भरभरुन मदत केली आणि त्यातला मलिदा 'इलेक्टोरल-बॉण्डस्, 'PM Care' च्या रुपात खाल्ला व आपल्या खास कंत्राटदारांवर मेहेरनजर दाखवून, हजारो-लाखो कोटींच्या कंत्राटांमध्ये; तसेच, महामार्ग-उड्डाणपुलांच्या टोल वगैरे वसुलीत करोडो करोडोंची मलई खात खात हे गब्बर झालेत. आपल्या राजकीय-स्वार्थापोटी, हरघडी जातधर्म-विद्वेष पसरवत व 'हिंदुत्वा'ला बदनाम करत...हा 'अखंड' देश, यांनी 'खंड खंड' करायला घेतलाय.

...तेव्हा, यांच्या दळभद्री राजकारणाचा 'भांडाफोड-पोलखोल' करणारा विनय दुबेंचा हा व्हिडिओ आवर्जून पहा....

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ‘महाराष्ट्राच्या निवडणुकांचे गुंते: राजकारण, जातीय समीकरणे आणि मतांचा खेळ’....विजय घोरपडे

**नमस्कार मित्रांनो... १९७४ साली, जब्बार पटेल दिग्दर्शित ''सामना'' नावाचा चित्रपट आला होता. त्यात असा सामाजिक आशय सांगण्यात आला होता की, दलितांवर अन्याय करणारा 'पाटील' म्हणजे, मराठा... त्या दलितांच्या अन्यायाविरोधात लढा देणारा गुरुजी म्हणजे, ब्राह्मण! हा चित्रपट तुफान चालला. अगदी अलिकडे म्हणजे, २०१६ मध्ये नागराज मंजुळे लिखित-दिग्दर्शित ''सैराट'' चित्रपट आला होता, तोही दलित-मराठा जाती संघर्षावर आधारित होता. हा चित्रपटदेखील तुफान चालला. मंजुळेचं कौतुक झालं, ते केवळ या एकाच चित्रपटापुरते. जब्बार पटेल यांचेही जे काही अफाट कौतुक झाले, ते केवळ ''सामना''पुरते... या दोघांच्याही इतर चित्रपटांची म ारशी दखलच घेतली गेली नाही. सार्वजनिक जीवनात कोणाला किती मोठं करायचं, कधी कौतुक करायचं? याचे मापदंड ठरवूनच टाकले गेले आहेत. अलिखित अशा गाईडलाईंन्स निश्चितच केल्या आहेत. म्हणून लोकं सांगतात की, ''लेखकांचं नाव पाहून लेख वाचायचा की, नाही हे आम्ही ठरवतो!''**

...तर, ही कमाल आहे, 'RSS'च्या राष्ट्रनिर्मितीची. गेली १०० वर्षे; जी, या मंडळींनी ''कुजबुज मोहिमम चालवून, समाजात जी दुही-तेढ-द्वेष निर्माण केला, एक जनमानस घडविले, त्याची ही कमाल आहे. हे जे 'RSS'चे 'अंडरग्राऊंड' कार्य चालू होते, त्याला उठाव दिला गेला वा तो त्यांना मिळाला, तो शिवसेनेच्या उदयातून. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी, १९६५/६६ दरम्यान मराठी माणसावरील अन्यायाविरोधात ''उठाव लुंगी बजाव पुंगी'' असा खुशाल द्वेषमूलक नारा दिला होता. एका उघड विद्वेषाचे बाळासाहेबांनी केलेले राजकीय भांडवल पाहून, RSS-भाजपा दिपून गेली... मग, ''हिंदुत्व''वादी मंडळींनी हळूच शिवसेनेत शिरकाव केला. तिथे जाऊन त्यांनी, मराठी माणसावर अन्याय होतोय असे सांगत, अनेक उच्चवर्णीयांना न्याय्य मिळवून दिला; तसेच, शिवसेनेत मुस्लिमविरोधी वातावरण निर्माण करण्यास प्रारंभ केला. 'शिवसेना' या सशक्त राजकीय ढालीचा उपयोग, हिंदू-मुस्लिम तेढ व्यापक करण्याचे ठरले आणि मग भाजपाच्या राष्ट्रीय नेत्यांनी (प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे आदी) 'मातोश्री'वर लोटांगणे घालण्यास सुरुवात केली. मंडल आयोग लागू होणार अशी चिन्हे दिसू लागताच, महाराष्ट्रात १९८९ साली भाजपा-शिवसेना युती जन्माला आली आणि १९९० मध्ये मंडल आयोग लागू झाला. मंडल-कमंडल आंदोलने झाली, रामरथ यात्रा निघाली. मग, १९९२ साली बाबरी विध्वंस आणि १९९३ मध्ये, मुंबई बॉम्बस्फोट आणि त्यानंतरची दंगल, या घटनाक्रमातून शिवसेना किमान २०/३० टक्के भाजपामय झाली होती... म्हणजेच, हिंदुत्ववादी!

भाजपा व शिवसेनेची पारंपरिक युती झाल्याने, हे पर्सेंटेज खूप वाढले. त्याचा फायदा एकनाथ शिंदे यांनी उचलला आणि ते सरळ भाजपासोबत गेले. शिंदेसोबत भले ई.डी.च्या भयाने काही आमदार गेले तरी, आज मतदारही गेल्याचे जे चित्र दिसत आहे, त्याला आर.एस.एस.ने त्या आधी, जी एक समाजात विघटनवादी बजबजपुरी माजविली, त्याचा परिणाम म्हणजे शिवसेनेची फूट! मतदारांची फूट आणि हा महाराष्ट्राचा कालचा अनाकलनीय निकाल. आता हा निकालही कसा संशयास्पद आहे ते पाहू...१९९५ मध्ये प्रथमतः शिवसेना-भाजपा युती सत्तेवर आली. या तथाकथित नॅचरल युतीला कधीही ३५ ते ३८ टक्क्यांच्या पुढे मते मिळाली नाहीत आणि आता एकट्या भाजपालाच ३० टक्क्यांच्या वर; तर, शिंदे यांना १२ टक्के आणि अजित पवार यांना १० टक्के... मिळून ५२/५५ टक्के मते मिळाली आहेत. आश्चर्य असे की, शेतकरी आजही भाजपावर पिसाटलेले आहेत; पण, विदर्भातून काँग्रेस साफ, मराठवाड्यातून शिवसेना साफ, पश्चिम महाराष्ट्रासह बारामतीही, शरद पवारांच्या हातून निसटली. ठाणे-मुंबई-कोकण आता, शिंदे-भाजपाचे झाले. लोकसभेमध्ये भाजपाला महाराष्ट्राने झिडकारले, हे अवघ्या पाच महिन्यांपूर्वी घडले.

**दरम्यान, भाजपाने उभा केलेला शिवछत्रपतींचा पुतळा पडला, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या तरुणाचे, चौकशीआधीच राज्याच्या पोलिसांनी एन्काऊंटर केले. रोजगार आणि महसूल देणाऱ्या सुमारे ११ कंपन्या महाराष्ट्रातून पळविल्या गेल्या आणि 'हे सर्व फार उत्तम काम शिंदे सरकारने केले, असं मतदारांचे शिक्कामोर्तब आहे; की, महागाई-बेरोजगारी यांच्या वेदना, महाराष्ट्रातल्या भगिनी थेट सरकारच्या 'लाडक्या' झाल्यामुळे कमी झाल्या? शेतकऱ्यांना मोफत वीज म्हणून त्यांच्या खुशीला काही पारावारच राहिला नाही; की, भाजपाला एकगठ्ठा मते दिल्याने ते आता ''सेफ'' झाले? नेमका भाजपाचा हा रेकॉर्डब्रेक निकाल कशाचा? हे आज कोणताही तज्ज्ञ विश्लेषक सांगत नाही. सांगत आहेत ते, भाजपा का जिंकली हे पटावे म्हणून, भाजपाने जी कारणे आधीच उभी केली, तिच कारणे सांगत आहेत.**

चला... हेही मान्य करु की, म ार मोठा पैशाचा खेळ झाला. त्यांची बातमी व्हावी अशी व्यवस्था तर, भाजपा नेत्यानेच फोन करुन केली... म्हणजे, एक कारण तर त्यांनीच जनतेसमोर आणले, ते का? लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपा सरकारचे ८०/९० कोटी लाभार्थी कामी आले नाहीत; पण, महाराष्ट्रात ४.५ कोटी लाडक्या बहिणी मात्र, कामी आल्या? पैसा, फोडाफोडी, कार्पोरेट सेटींग, भावनिक प्रचार हे सर्व झारखंडमध्येही झाले; तरी, तिथे विजय नाही आणि इथे ''हार'' नाही. मुंबई-महाराष्ट्रासारखी गुजराथी लॉबी झारखंडमध्येही आहे. २२ कार्पोरेट कंपन्या तिथेही आहेत; पण, निकाल अविश्वसनीय लागला तो महाराष्ट्राचा. आदिवासी ठामपणे, आदिवासी मुख्यमंत्र्यांच्यामागे उभे राहिले आणि मराठी माणूस छत्रपतींना सोडून पेशव्यांच्या मागे गेला... म्हणजे, हिंदुत्वाच्या मागे गेले असे चित्र उभे करण्यात येत आहे. सर्व चॅनल्स, दैनिके, विश्लेषक हे भाजपा-RSSच्या ''मायक्रो मॅनेजमेंट''चे अमाप कौतुक करत आहेत आणि मतदारांचा अख्खा सोशल मिडिया, सामुहिक चर्चा हा निकाल मान्यच करत नाहीत... कारण, **भाजपाचा हा खेळ म्हणजे, जेव्हा दोन राज्यांत निवडणूका असतात, तेंव्हा जिथे जिंकण्याचे वातावरण तयार करण्यात आले तिथे जिंकायचे, दुसरे हरायचे. मागे वळून पाहिले तर, अगदी डिसेंबर २०२२मध्ये गुजरात व हिमाचल प्रदेश निवडणुका झाल्या. गुजरात जिंकले, हिमाचल हरले. कालचे हरियाणा-जम्मू काश्मीर, तेंव्हाही हरियाणा जिंकले, काश्मीर हरले आणि आज महाराष्ट्र जिंकले, झारखंड हरले. अशी ही स्ट्रेटीजी आहे.** सामान्य माणूस यावर काय विचारणार? तर ''महाराष्ट्रात ईव्हीएमची सेटींग केली मग झारखंडमध्ये का नाही केली?'' असा हा संभ्रम, भाजपा कायम आणि प्रत्येक गोष्टीत निर्माण करते. २०१९च्या निवडणूकीत ''शरद पवारांचं राजकारण संपलं'' अशी भाजपाने दवंडी पिटली होती, काय झालं? लक्षात घ्या. या जिंकलेल्या तिन्ही राज्यात भाजपा सत्तेवरच होती. वस्तुतः आजपर्यंत सत्तापक्ष जिंकला म्हणून त्याचे वारेमाप कौतुक करण्याची प्रथा नव्हती, ती आता भाजपाने नव्याने सुरू केली आहे. कारण, ''प्रशासकीय यंत्रणा'' राबवून भाजपा जिंकते, असे गालबोट लागायला नको. अर्थात अशापद्धतीने जिंकण्यासाठी, झारखंडचे सोरेन सरकार पाडून, आपले सरकार आणण्याचे आणि मुख्यमंत्र्यांना जेलमध्ये टाकण्याचेही प्रयत्न झाले होते, तसेच प्रयत्न हिमाचल प्रदेशातही झाले होते. हे आठवत असेलच ना? तेंव्हा हा जो रस्त्यावर, टीव्हीवर जल्लोष उभा करण्यात येत आहे तो ''चोर के मन में तिनका'' आणि तो दबला जावा यासाठी हा देखावा... आणि हो, हा निकाल केवळ ईव्हीएम घोटाळ्यापुरता मर्यादित नाही. निवडणूक काळात जी सर्वोच्च ऑथॉरिटी म्हणून ''आयोग'' असतो, त्याच्या पक्षपातीपणाचाही आहे. पैसा पकडला पण, केस नाही. विरोधीपक्षाच्या मतदारांना दूरची आणि वेगवेगळी केंद्रे. मतदानापूर्वीच याद्या तपासणीसाठी भाजपाकडे सुपूर्द झाल्या होत्या, अशाही तक्रारी आहेत. मतदारांची नावे नाहीत, बिल्डिंगच्या बिल्डिंग गायब. १० लाख नवे मतदार आले, महिलांच्या, लाडक्या बहिणींच्या मतदानाची आकडेवारी अद्याप नाही... पण, नेरेशन काय सेट केले? तर, लाडक्या बहिणींमुळे भाजपा जिंकली... म्हणजे, कुटुंबात मूट पाडणे चालूच. कॉम्प्युटर नव्हते, तेव्हा त्याच रात्री एकूण मतदानाची संख्या व टक्केवारी जाहिर होत असे आणि आज ते होत नाही. असे अनेक मुद्दे आहेत. प्रशासन, उच्चशिक्षित, उच्चवर्णीय, उच्च मध्यमवर्गीय, श्रीमंत आणि गर्भश्रीमंत मंडळी, राहूल गांधी यांच्या ''जातीनिहाय जनगणना आणि त्यानुसार हिस्सेदारी'' या मागणीने आजच हवालदिल झाली आहेत. ''ते सर्व आज भाजपासोबत आहेत आणि या सगळ्यांनी मिळून, जनताही भाजपासोबत आहे, बाकी तमाम नेत्यांना नाकारले आहे. त्यांचे राजकीय भविष्य संपलेले आहे!'' असा संदेश या निकालाद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे. आता बारी सर्व विरोधी पक्षांची आहे. ते काय करतात? काय भूमिका घेतात? याकडे जनता लक्ष ठेवून आहे... धन्यवाद !!!

*....विजय घोरपडे*

# केवळ ५ महिन्यांत जनमत एवढं बदलतं ???

लोकसभेला जेमतेम ९ खासदार निवडून आणणारे आणि त्यामुळे 'मला यातून मोकळं करा' असा टाहो फोडणारे फडणवीस विधानसभा निवडणुकीत १३२ आमदार एकहाती निवडून आणतात आणि ८ खासदार निवडून आणणारे शरद पवार १० आमदारही निवडून आणत नाहीत!

पाच महिन्यांपूर्वी जेमतेम १८ खासदार निवडून आणणारी महायुती विधानसभेला २३० आमदार निवडून आणते आणि ३० खासदार निवडून आणणाऱ्या महाविकास आघाडीला फक्त ५० आमदारांमध्ये गाशा गुंडाळावा लागतो, हे निमूट मान्य करायचं?

**यात सगळ्यात आश्चर्य म्हणजे अजित दादांच्या राष्ट्रवादीने जिंकलेल्या जागा. लोकसभेत चार पैकी केवळ एकच खासदार निवडून आणला. म्हणजे स्ट्राईक रेट फक्त २५ टक्के! टोटल नापास! त्यामुळे अजित पवारांची राष्ट्रवादी ही संघाला तेव्हा युतीतलं लोढणं वाटली. रोज त्यावरुन दादांनी हेटाळणी सहन केली. 'मांडीला मांडी लावून बसलं तरी ओकारी येते' असं शिंदेंची शिवसेनाही म्हणत होती. बारामतीसाठी तर अक्षरश: डोळ्यात पाणी आणावं लागलं इतकी गयावया दादांना करावी लागली. थोडक्यात, अजित पवारांचं यंदा काही खरं नाही, अशीच एकूण परिस्थिती होती.**

अशा प्रतिकूल परिस्थितीतही अजित दादांच्या गुलाबी जॅकेटने ५१ पैकी ४० आमदार निवडून आणले. म्हणजे स्ट्राईक रेट तब्बल ७८ टक्के! दहावीच्या परीक्षेत वार्षिकला नापास झालेला विद्यार्थी बाहेरुन सतरा नंबरचा फॉर्म भरुन थेट डिस्टींक्शनमध्ये यावा, इतका चमत्कार तर रेगे क्लासेस वा गेला बाजार चाटे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनिही केलेला नाही. 'मला मत म्हणजे भाजपला मत नाही', इतकं स्पष्ट जाहीरपणे बोलूनही अजित दादांच्या राष्ट्रवादीला संघ स्वयंसेवकांनी आणि शिंदेंच्या कार्यकर्त्यांनीही मदत केली यावर विश्वास ठेवायचा? पाच महिन्यात त्यांचं एवढं मनपरिवर्तन झालं?

ही फक्त लगेच आठवलेली उदाहरणे आहेत. मतदारसंघनिहाय फॅक्ट चेक केलं तर आणखीनच वेगळी माहिती मिळेल.

**कुठलं वातावरण नाही, कुठला ग्राऊंड रिपोर्ट नाही, भक्तांच्या बोलण्यात कधी उल्लेख नाही, त्यांच्या सोशल गटावर याची साधी कधी चर्चा झाली नाही. एवढ्या वाहिन्यांच्या स्वतंत्र म्हणवणाऱ्या एकाही पत्रकारांच्या अंदाजात याचं प्रतिबिंब नाही. दूरदूरपर्यंत कुणाचा कुठला तसा अंदाज नाही. जास्तीत जास्त १६०-१७० पर्यंत महायुतीला जागा मिळतील पण बहुमत मिळेल, असं खुद्द भाजपचे धुरीणच सांगत होते. तिथे सव्वादोनशेच्याही पुढे जागा आणि अचंबित वाटावं इतकं बहुमत महायुतीला कसे काय मिळते?**

**हे सगळं काय चाललं आहे?**

**केवळ ५ महिन्यात जनमत एवढं बदलतं?**

**मान्य की लाडकी बहिण योजनेचा यामध्ये मोठ्ठा वाटा आहे...पण इतका?**

केवळ ५ महिन्यात ४० लाख महिला मतदारांची संख्या वाढली. म्हणजे प्रत्येक मतदारसंघात जवळपास १३९०० महिला मतदारांची संख्या वाढली. याचा अर्थ केवळ पाच महिन्यात प्रत्येक मतदारसंघात जवळपास १३००० हून अधिक मक्त महिला मतदारांची नोंदणी झाली. भारतीय निवडणुकीच्या इतिहासात हा एक




विक्रमच म्हणायला हवा. जे काम टी.एन. शेषननाही जमले नाही, ते राजीव कुमारांच्या कार्यकाळात घडले, असेच म्हणावे लागेल. ही माहिती निकालाच्या एक दिवस आधी प्रसारमाध्यमांमध्ये येते. तोवर कुणाला माहितही नव्हतं की इतक्या प्रमाणात महिला मतदारांची नोंदणी झालीय. दुसऱ्याच दिवशी निकाल लागतो आणि लाडक्या बहिणींची वेडी माया बंधूरायाला जॅकपॉटच जिंकून देते. महिला मतदारांची वाढलेली नोंदणी आणि लाडक्या बहिणींनी महायुतीला केलेलं मतदान हा निव्वळ योगायोग म्हणायचा?

**आणखी एक योगायोग म्हणजे लोकसभेच्या निवडणूकीत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मतदानाच्या आकडेवारीत सतत बदल होणं! विश्लेषकांनी आकडेवारीसह सप्रमाण हे सिध्द केलं की २०० जागाही जिंकू शकली नसती तिथे भाजप २४० जागांवर जिंकली. म्हणजे बदललेल्या आकड्यांचा ४० जागांवर परिणाम झाला. हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीतही तसाच प्रकार झाला. सकाळी ११ वाजता जिलेबी वाटणारी इंडिया आघाडी संध्याकाळी ४ वाजता इतकी मागे पडली की, राज्यातील सत्ताच हातातून गेली. आता महाराष्ट्राच्या निवडणुकीतही तसाच प्रकार झाला! गेल्या जवळपास सहा महिन्यात निवडणूक आयोगाच्या आकडेवारीत तफावत दिसणं आणि भाजपची सत्ता तिथं येणं हा ही पुन्हा योगायोगच!**

क्षणभर मान्य करु की इव्हीएममध्ये काही गडबड नाहीय. पण मग निवडणूक आयोगाच्या निवडीच्या समितीतून सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना का हटवलं? तिथे लागलीच अमित शहांना का आणलं? चंदीगढच्य महापौर निवडणूकीत मतपत्रिका बदलताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे चोरी पकडली गेली. हे तरी मान्य कराल ना? व्हीव्हीपॅटची आकडेवारी मोजायची तर निकाल जाहीर करायला आणखी वेळ लागेल, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सांगितलं आणि सर्वोच्च न्यायलयालाही ते पटलं! या दोन यंत्रणा म्हणे स्वायत्त आणि लोकशाही रक्षणाचे खांब आहेत, यासारखा विनोद नाही! हे सगळं का होतं? कशासाठी होतं? क्षणभर काय तहहयात आपण हे मान्य करु की ईव्हिएममध्ये काहीही गडबड नाहीय. पण मग ज्या गडबडी उघड्या डोळ्यांदेखत घडल्या त्यांची कारणे काय?

निवडणूक आयोगाची मतदानाची आकडेवारी नेहमी बदलत का असते? मतमोजणीत अशी कोणती फट राहते की मतदानाची आकडेवारी नेहमी बदलत असते? आणि ही फट त्या त्या वेळीच बुजवली का जात नाही? निवडणूक आयोगाने एकदा जाहीर केलेली आकडेवारी पुन्हा बदलतेच कशी? दर निवडणुकीत हा प्रकार का होतो? निवडणूक यंत्रणेचं काम जवळून पाहणाऱ्या मंडळींचं म्हणणं आहे की ईव्हीएमवर संशय घेणं बरोबर नाही. मान्य! पण मग निवडणूक आयोगाच्या या बदलत्या आकडेवारीबद्दल या मंडळींचे काय म्हणणे आहे?

**हारणाऱ्यांनी सतत संशय घेणं बरोबर नाही, हे अगदी योग्यच. पण मग जिंकणाऱ्यानेही सतत संशयाच्या सावलीत राहणं पसंत करणं, हे ही बरोबर नाही. मुद्दा कोण हरलं कोण जिंकलं हा नाही. तर हरण्या-जिंकण्याच्या प्रक्रियेत सामील असणारांनाही हे सगळं विश्वसनीय वाटलं पाहिजे. त्यात जर देशातल्या यंत्रणेवरच प्रश्नचिन्ह असेल तर तो मुद्दा प्राधान्याने निकाली काढण्यासाठी नागरिकांनीच पुढाकार घ्यायला हवा.**

निवडणूक आयोगाने एकदा जाहीर केलेली आकडेवारी बदलतेच का, मतदानाची आकडेवारी जाहीर करायला निवडणूक आयोगाला दोन-दोन दिवस का लागतात आणि व्हीव्हीपॅट मोजायच्याच नसतील तर त्या मतदान यंत्राला जोडताच का? हे आणि असे प्रश्न आपण विचारलेच पाहिजेत!

*...आनंद भंडारे*

# 'EVM'ची व्यवस्था ही, गोलमाल व्यवस्था आहे... याबद्दल आता कोणालाही शंका नको !

हा गोलमाल कशा तऱ्हेने केला जातो, त्यात काही मंडळी म्हणतात त्या प्रमाणे इस्त्राईलची टेक्नोलॉजी आहे की EVM बदलल्या जातात किंवा अजून काही घपला केला जातो. हा फक्त आणि फक्त. CRIMINL INVESTIGTION चाच विषय आहे .

याचे कारण स्पष्ट आहे. EVM संबंधित प्रत्येक पायरीवर गुप्तता आणि Manipulation आहे

१. EVM Mo Software आणि क्रीवुरीश काय आहे ते आम्ही सांगणार नाही, त्याचे परीक्षण आमच्याच सांगण्याच्या अनुसार करा

२. Mandetory VVPT-EVM Verification हे प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील फक्त पांच EVM चं केल जाईल याला कोणताही तार्किक किंवा Statistical आधार नाही

३. Mandetory VVPT-EVM Verification मधे कोणत्याही जोडीच्या मतांमध्ये फरक आढळला तर VVPT च्या मतांना लक्षात घेऊन निर्णय केला जातो. याचा अर्थ इतर कोणत्याही एतच् मधे गोलमाल असल्यास तो शोधण्याची कोणतीही व्यवस्था नाही


४. ReCounting जर हवे असेल तर, VVPT मधे Record झालेली मते मोजण्याची मागणी करण्याची कोणतीही व्यवस्था नाही

५. सर्वोच्च न्यायालयाने DR च्या एका याचिकेवर निर्णय देताना पराभूत झालेल्या उमेदवाराला ५ टक्के मतांची फेरमोजणी करण्याची मागणी करता येईल असा निर्णय दिलेला होता. ही मोजणी करण्यासाठी निवडणूक आयोगाने जे Technical Standard तयार करवून घेतले आहे त्यानुसार ततझढ मधे निवडणुकीत टाकल्या गेलेल्या मतांची मोजणी केली जात नाही. तर, निवडणुकीतील एतच-ततझढ मधील संपूर्ण Data हा Eraze करून त्यावर नवीन Mock Poll दाखवून त्यात कोणताही गोंधळ नसल्याचे सिद्ध केले जाते. (हे श्री sim Sarode यांच्या एका व्हिडिओ वर आधारित आहे.. ते Technical Standard मला अजून मिळू शकलेले नाही)

हे सर्व लक्षात घेता आणि त्याच बरोबर निवडणूक आयुक्त श्री नवीन कुमार यांच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या पदावर नियुक्त करण्यासाठी पंतप्रधान मोदींनी घातलेल्या माकड उड्या लक्षात घेतल्या तर या सर्व गोलमाल मधे मोदी आणि नवीन कुमार यांचा हात असल्याचा संशय घेण्यास पूर्ण जागा आहे. याचा अर्थ आपली लोकशाही Compromised आहे आणि भारत एक BaNaNa Republic आहे.

Enjoy अच्छे दिन.

***– मिलिंद कोतवाल***




हिंदू असो, मुसलमान असो, ख्रिश्चन असो, वा असो बौद्ध, शीख, जैन, यहुदी...हे नावाला धर्म आहेत. त्यांचं संरक्षण करावं लागतं आणि त्याकामी, मनुष्यजात आपापसात लढून रक्ताचे पाट वहात रहाते...हा सगळाच तद्दन महामूर्खपणा आहे आणि अखिल मानवी समाज, तो महामूर्खपणा पिढ्यानपिढ्या करत आलाय व न जाणो अजून किती पिढ्या करत रहाणार आहे! ''तुम्हाला वरकरणी तात्पुरती स्वतःच्या मनाची समजूत घालून शांतपणे जगायचं असेल; तर, ईश्वरावर विश्वास ठेवा... पण, जर 'सत्य' जाणून घ्यायचं असेल; तर, ईश्वराच्या अस्तित्वावर, प्रश्न उभे करायला शिका''...नित्शेची ही क्रांतिकारी विचारधारा, तत्कालिन ख्रिस्ती समाजाला मुळापासून प्रचंड हादरे देऊन गेली...विनाशकारी-विध्वंसक 'भांडवलशाही'ला आव्हान देण्यासाठी, आज अशाच वैचारिक-उत्पातांची नितांत गरज आहे.

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# EVM म्हणजे लोकशाहीचा सर्वात मोठा शत्रू

काँग्रेसमुक्त भारत म्हणणाऱ्यांच्या तोंडच पाणी आत्ताच तीन चार महिन्याआधी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालात पळालं होतं. इतक्या कमी कालावधीत केंद्र आणि युती सरकारने असा कोणता विकासाचा तिर मारला कि त्यांना अचानक इतके जास्त मतदान पडू शकले ? महायुतीचे सर्व उमेदवार बोगस पद्धतीने निवडून आलेले आहेत. EVM**मधील मतमोजणीचे आकडे आणि** actual **मतमोजणीच्या आकड्यामध्ये देखील खुपमोठी तफावत आढळली आहे आणि हे सर्व** on record **आहे. केवळ काँग्रेसच नाही तर अनेक पक्षांच्या उमेदवारांनी याबाबत तीव्र आक्षेप नोंदवले आहे.** कुठे EVM चे seal तुटलेले तर कुठे full बॅटरी चार्ज असलेले EVM आढळून आले. राज्यातील गावच्या गांव EVM विरोधात आवाज उठवीत आहेत. लोकांना या निकालावर मुळीच विश्वास बसत नाहीये. पोस्टलद्वारे जे मतदान झाले त्यात महाविकास आघाडी यांनाच बहुमत आहे मग तो ट्रेंड EVM मध्ये अचानक कसा बदलू शकतो ? आता EVM विरोधात लवकरच खुप मोठे जण आंदोलन सुरु झाल्याचे येत्या काळात सर्वांना दिसेल.

# महाराष्ट्र-विधानसभा-निवडणुकीचा अन्वयार्थ, थोडक्यात....

मुसलमानांची जिरवायची म्हणून मराठे भाजपसोबत, मराठ्यांची (जरांगे-पाटलाची) जिरवायची म्हणून ओबीसी भाजपसोबत, प्रकाश आंबेडकरांच्या मागणीला (‘अंगापेक्षा बोंगा मोठा’, असा तो ‘अतिहावरेपणा’ला का असेना) कधिच सकारात्मक प्रतिसाद देत नाहीत; म्हणून, ‘मविआ’ची जिरवायला ‘दलित’ भाजपसोबत आणि शिवसेनेनंच ‘भाजप-संघा’ला मोठं केलं; म्हणून, शिवसेनेची जिरवायला ‘मुसलमान’ भाजपसोबत....

...ही विधानसभा-निवडणूक म्हणजे, ‘‘मत अडवा, मत जिरवा’’, असा कुठला ‘जिरवाजिरवी’चा ‘एक कलमी’ किंवा ‘किमान समान’ (CM...Common Minimum) ‘महाराष्ट्रीय-कार्यक्रम’ होता?

...जसा ‘गटारी’, हा महाराष्ट्रीय-सण बनलाय अलिकडे, तसं काही घडलंय का? ...एवढी राजकीय-दारु, मराठी माणसांच्या डोक्यात ‘झिंग झिंग झिंगाट’ करत धुमशान घालायला लागलीय??

...की, फाटक्या संसाराची गोधडी शिवण्यासाठी गुलाबी रिक्षा चालवण्याची शिकस्त करणाऱ्या व ‘दिड हजारा’त गुलाम बनायला तयार असणाऱ्या बहिणींच्या लाचारीचं हे लाजिरवाणं दर्शन मानायचं... की, की, ‘कंत्राटी-गुलाम’ असलेल्या त्यांच्या नवर्या/भावांच्या अगतिकतेचं-हतबलतेचं हे उघडंनागडं प्रदर्शन समजायचं???

...अजून काय काय वेगळे अर्थ काढायचे...या EVM ‘निवडणूक-सेटिंग’च्या; तसेच, काळा पैसा-उधळणीच्या (‘काळा-भंडारा’) ‘करेक्ट-कार्यक्रमा’ला...भाजप-संघाच्या खलनायकी-प्रचार-यंत्रणेकडून समजून घेताना आणि आपणच आपली गांडू समजूत करवून घेताना...???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# निवडणुकीचा शिमगा संपला...आता त्याचं ‘कवित्व’ समस्त कामगार-कर्मचारीवर्गाला भोगावं लागणार आहे!

महाराष्ट्राची निवडणूक आटोपताच ‘बीजेपी’चा हत्ती... आपले खरे दात दाखवायला लागलाय. भाजपा (NDA) सरकारने आता तीन काळ्या कामगार-कायद्यांनी बनलेली ‘काळी कामगार-संहिता’ (Black Labour-Code) झपाट्याने लागू करायला घेतलीय...कल्पनातीत अशा भयंकर गुलामगिरीला व कंपनी-दहशतवादाला रोजच्या रोज तोंड देत कॉर्पोरेटीय क्षेत्रात आणि इतरही छोट्यामोठ्या कंपन्या-कारखान्यांमधून सगळ्यांनाच नोकरी मुठीत धरुन जगावं लागणार आहे...

या भयंकर दुरवस्थेतून कामगारांना केवळ आणि केवळ, एकच राजकीय पक्ष बाहेर काढू शकतो...त्याचं नाव ङधर्मराज्य पक्षफ!

...त्यासाठी, धर्मराज्य पक्षाचे सभासद व्हा, धर्मराज्य पक्षाच्या राजकीय-धोरणांना पाठिंबा द्या, धर्मराज्य पक्षाचे आमदार-खासदार निवडून द्या... तर आणि तरच, काही तरणोपाय आहे...अन्यथा, ‘भाजप-संघा’च्या कामगारद्रोही खोल ‘भांडवली-डोहा’त, तुम्हीही बुडाल आणि बुडताना भविष्यातल्या मराठी पिढ्या पिढ्यांनाही बरबाद करुन जाल...!!!

**...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

(सदरहू संदेश पाठवताच, एका ‘देशपांडे’ आडनावाच्या कट्टर (म्हणजेच, निर्बुद्ध...दगडासारखा काहीही व कितीही व्यवहारात विपरीत आढळले तरी अपरिवर्तनीय रहाणारा) भाजप-संघीय ‘अंधभक्ता’चा एकदम पोटशूळ उठला आणि तो प्रतिक्रिया लिहीता झाला की, ‘‘राजन राजे, बेडूक कितीही फुगला तरी व्यर्थ. तुमचा ‘धर्मराज्य पक्ष’ कितीजणांना माहित आहे, याची आधी माहिती घ्या...’’ तेव्हा, शांतचित्ताने त्या ‘विचारवंता’ला नव्हे; तर, ‘विखारजंतू’ला लागलीच खालीलप्रमाणे नुकतंच मी उत्तर दिलं, ते वाचकांसमोर नम्रपणे ठेवतो....)

कसं आहे देशपांडेराव...( खरं म्हणजे, डराव डराव) की, ईव्हीएममधल्या बेईमानी आणि फसवणुकीने बेडकाचा बैल (तो ही अदानी-अंबानीसारख्यांचा ‘काळा-पैसा’ खाऊन खाऊन धष्टपुष्ट झालेला) होण्यापेक्षा...प्रामाणिकपणे, मेहनतीने, चिकाटीने बेडकाचा सच्चा बैल (तुमच्या ‘संघ-बीजेपी’सारखा लुच्चा नव्हे) होण्याचा प्रयत्न करणं, काय हो वाईट...??? आमच्या ‘धर्मराज्य पक्ष’ नावाच्या बेडकाचा बैल झाला तर, त्यात मराठी जनतेचं सर्वंकष कल्याण आहे, गुजराथी-भाषिक भांडवलदारांच्या गुलामगिरीतून त्यांची मुक्ती आहे ...न झाला; तर, नुकसान आमचं वैयक्तिक थोडंच होणार आहे? परमेश्वरानं आम्हाला काहीही कमी ठेवलेलं नाही...आम्ही आजही सुखात आहोत आणि ईश्वरीकृपा राहिली तर, उद्याही राहू! तेव्हा, सामान्य मराठी-माणसांच्या



(तुमच्यासारख्या कमवून बसलेल्या गब्बर मराठी-लोकांसाठी नव्हे) भल्यासाठीच केवळ आम्ही तडफडतो आहोत... बेडकाचा बैल व्हावा यासाठी आमचा वेडावाकडा कुठलाही आग्रह नाही, झालाच तर तो सरळ मार्गाने व्हावा... न झालाच तर आमचं काडीचंही नुकसान नाही. उलट, आयुष्यात प्रथमच शेवटी शेवटी का होईना; पण, चांगला आराम मिळेल!

लक्षात घ्या, श्रीकृष्णाने गीतेत ‘कर्मसिद्धांता’द्वारे सांगून ठेवलंय (जसे, मुस्लिम-अतिरेकी कधि कुराण वाचत नसतात; तसेच, तुमच्यासारखे म्हणजेच, भाजप-संघाच्या ‘अंधभक्तां’सारखे, बनावट-बेगडी हिंदुत्ववादी... गीता कधि वाचत नसतात; फक्त, हिंदूहिंदू म्हणून नाचत असतात) की, तुम्ही वाईट कर्म करत फार झपाट्याने मोठे होता (जसा तुमचा खासमखास ‘अदानी’ झाला); पण ते पहात नियती खदा खदा हसत असते आणि तुमच्या कर्माचं ‘कर्मफळ’ पक्क होताच, पदरात यथावकाश पापाचं ‘माप’ टाकतेच.

तुमच्याच म्हणण्यानुसार, दीड हजाराच्या क्षुद्र मोहाने महायुतीला मतं देणाऱ्या व प्रत्यक्षात ‘लंकेची पार्वती’ असणाऱ्या दरिद्री ‘लाडक्या बहिणीं’हूनही, लोकलज्जा सोडलेल्या तुम्हा लोकांचा अति अति लाडका ‘अदानी’...आता श्रीकृष्णाच्या ‘कर्मसिद्धांता’चा अनुभव लवकरच घेईल आणि तुमचे मोदी-शाह त्याला तारु तर शकणार नाहीतच; पण, तसा काही प्रयत्न त्यांनी केला तर, स्वतःच गोत्यात येतील... तेव्हा, केल्या महापातकांमुळे काळाच्या ओघात पुन्हा ‘बे एके बे’ या पूर्वीच्या लोकसभा-सदस्य संख्येला भाजप ‘भोज्या’ करेलच, याची खात्री बाळगा...फक्त, ही ‘बीजेपी’ची जादूची पोतडी असलेलं EVM, तीव्र जनआंदोलनातून एकदाचं नाहीसं होऊ द्या पुन्हा ‘कागदी मतपत्रिके’वर (Ballot Paper) मतदान करणं, सुरु होऊ द्या...कारण, त्या निवडणूक-आयोगाच्या पिंजऱ्यातल्या ‘EVM’ नावाच्या पोपटातच ‘भाजप’ नावाच्या राक्षसी पक्षाचा ‘प्राण’ दडलेला आहे... तो पोपटच मारुन टाकल्याखेरीज ‘भाजप’ नावाच्या राक्षसाचा ‘राजकीय-मृत्यू’ होणे नाही... ‘‘गुहेतल्या पिंजऱ्यातला पोपट मारल्याशिवाय राक्षस मरणार नाही’’, हे एखाद्या सुरस कथेतल्या राजपुत्राला जसं रहस्य उमगतं...तसंच, आजच्या भारतीय-जनतेच्या हृदयातल्या व लोकशाहीला काळजीपूर्वक जपणाऱ्या ‘आधुनिक राजपुत्रा’ला (ज्याला, तुम्ही ‘शहजादे’ म्हणून करोडो रुपये खर्च करुन आजवर हिणवत आलात, तोच तो) चांगलंच उमगलंय...त्याकामी, संपूर्ण भारतीय जनता ‘भारत जोडो’ पदयात्रेसारखीच त्याच्या खंबीरपणे पाठिशी उभी राहील...लोकसभा-निवडणुकी पाठोपाठ महाराष्ट्र-विधानसभा निवडणुकीतल्या EVM हेराफेरी आणि बड्या गुजराथी-भांडवलदारांच्या काळ्या पैशाच्या पेरणी-फिरवाफिरवी नंतर भाजपाच्या अंताची सुरुवात झालीय...बस्, देखते रहो!

## दीड दमडीचा 'मटा'संवाद आणि वाचन प्रेरणा 'दीन'!

जिथे घरटी पाच मोबाइल
आणि दोन दुचाक्या आहेत,
जिथे टीव्ही स्क्रीनचा आकार
इंचाइंचाने वाढतच आहे,
जिथे कुठल्याही मराठी लेखकाचे,
कुठलेही पुस्तक,
औषधालाही सापडत नाही,
'काही वाचायचे असते'याचा
ज्याला वाराही लागलेला नाही,
त्या थोर घरकुलांतील,
आधुनिक मराठी जनांना,
वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा!

जिथे कार्यक्रमांची संख्या
प्रेक्षकांच्या संख्येहून अधिक आहे,
जिथे लेखकांची संख्या,
वाचकांच्या संख्येहून अधिक आहे,
जिथे पुस्तक येणार म्हटले की
शुभेच्छांच्या अंगठ्याचे पूर येतात,
आणि पुस्तक आले म्हटल्यावर
तेच अंगठे पुन्हा 'दाखवले'जातात.
जिथे रसिक आपले रसिकत्व,
हौशेने वेशीवर टांगतात
आणि 'तुमचे पुस्तक पाहिले'
असे एकमेकांना आवर्जून सांगतात
त्या 'दगडांच्याही'देशातील 'वाचकांना'
वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा!

प्रशस्त हॉलमधील डिझायनर सोफा,
कुठल्या तरी महाराजांची तस्वीर
आणि चकाकत्या हिऱ्यांच्या अंगठ्या,
सुविधासंपन्न, यशस्वी बोटांत.
मंद दिव्याच्या प्रकाशातील
'मिनी बार'मध्ये जिथे
देशी-विदेशी सख्या निवांत
उभ्या असतात थाटात,
बघणारेही उत्सुक असतात
त्यांना घेण्या पोटात
जिथे मराठी साहित्य
चखण्यापुरतेही ठाऊक नसते
कॉलेजात वाचले तेच
शेवटचे असते.
लेखक, साहित्य, पुस्तके आदी
म्हणजे तर त्यांना,
परग्रहावरील जीवसृष्टी भासते
त्या अस्सल मराठी जनांना
वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा!

जिथे पगार 'भेटतो',
आणि माणसे 'मिळतात',
अभिमान केविलवाणा होतो,
त्याला 'गर्वा'चे साप गिळतात.
'तो आलेला' 'मी गेलेलो'
असे भाषेचे हाल झाले, तरी
भावना कळतात.
ऱ्हस्व, दीर्घ बघा म्हटले, की
जातीय कल्ला होतो,
भाषा राहते बाजूला,
आणि भलताच हल्ला होतो.
ही सगळी मोडतोड, गपगुमान
सहन करणाऱ्यांना,
वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा!

जिथे पुस्तके हजारोंनी 'काढली'जातात
शेकड्याने चाळली जातात
आणि दशकाने वाचली जातात,
छटाकभर पोस्टी वाचून जिथे
'तुमचे आता पुस्तक आले पाहिजे'
असे फेसबुके मित्र सांगतात
आणि पुस्तक आल्यावर मात्र
नकळत कुठे तरी पांगतात.
जिथे छापणे स्वस्त झाले,
वाचणे दुर्मीळ झाले,
लेखकपण मिरवण्याचे आणि
वाचकपण दाखवण्याचे दिवस आले,
त्या 'दिल्लीचेही तख्त'राखणाऱ्यांना
'वाचन प्रेरणा दिना'च्या शुभेच्छा!

जिथे पुलं वाचून माहिती आहेत,
अत्रे ऐकून माहिती आहेत,
वपु कॅसेटमधून 'कळले'आहेत
आणि पाडगावकर गाण्यांतून
'कळले'आहेत.
जिथे जीए म्हणजे फक्त 'गॉगल' वाटतो
ग्रेस कुणी तरी 'पागल'वाटतो,
'विश्वासरावांचे पानिपत' हा
इतिहास की वर्तमान, असा गोंधळ उडतो
'ठणठणपाळ' म्हटले की डोक्यावर
फक्त लाकडी हातोडा पडतो
गुप्ते, सखदेव, येले, मतकरी
यांची नावे जिथे ऐकल्यासारखी वाटतात
मराठी साहित्य म्हटले की केवळ
भूतकाळांचे हुंदके दाटतात
त्या साहित्यप्रेमी महाराष्ट्राला
वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा!

– तंबी दुराई

१०० काळ्या मुंग्या आणि १०० लाल मुंग्या गोळा करून काचेच्या बरणीत ठेवल्यास काहीही होणार नाही.

पण जर का तुम्ही... बरणी जाणीवपूर्वक व हिंसकपणे हलवली तर काळ्या मुंग्या लाल मुंग्यां एकमेकांना शत्रू समजून मारायला सुरुवात करतील.

लाल रंगाला वाटेल की काळा शत्रू आहे तर काळ्याला वाटेल की लाल शत्रू आहे !!!

पण खरा शत्रू आहे, तो जार हलवणारी व्यक्ती.

समाजातही सध्या असेच आहे.

– पुरुष विरुद्ध महिला
– डावीकडे विरुद्ध उजवीकडे
– श्रीमंत विरुद्ध गरीब
– विश्वास विरुद्ध विज्ञान.
– जात विरुद्ध जात
– धर्म विरुद्ध धर्म.

बरणी हलवणाऱ्याला सहाय्यभूत आहेत. वांझोट्या चर्चा, अफवा आणि विकृत सोशल मीडिया. एकमेकांशी लढण्यापूर्वी, आपण स्वत:ला विचारायला हवं: 'बरणी नेमकी कोणी हलवली आणि तो का हलवतोय ?' याचा शांतपणे विचार करा...

आधी बरणी हलवणारे हात शोधा आणि मग ती बरणी हलवणारी विकृती संपवा.

'फक्त माणुसकीवर आणि भारतावर प्रेम करा'



''लाल बावट्याची प्रतिक्रांती'', माझे स्नेही व लेखक-परीक्षक सुनिलजी कर्णिक यांच्या वरील ? फोटोसंबंधाने अचूक मर्मभेदी प्रतिक्रियेवर थोडं बोललं पाहिजे... 'प्रतिक्रांती' म्हणजे जी, कल्याणकारी-राज्य संकल्पना राबवू पहाणाऱ्या साम्यवाद-समाजवादी 'लालक्रांती'ची पिल्लं गर्भावस्थेतंच मारुन टाकते, अशी समाजघातकी व्यवस्था! व्रतवैकल्य-कर्मकांडांच्या सळसुळाटाखेरीज बहुजनसमाज आपल्या पूर्ण नियंत्रणाखाली येणे नाही, म्हणून पूर्वी व आता, त्यावाचून आपलं उखळ विनाविघ्न सदैव पांढरं होत रहाणे नाही, म्हणून मुठभरांचंच (अंबानी-अदानीसारखे शे-दिडशे बडे भांडवलदार, प्रस्थापित राजकारणी व सरकारी-अधिकारीवर्ग) चांगभलं पहाणारी व बहुसंख्याकांचा सन्मान आणि सुरक्षितता पायदळी तुडवणारी 'भांडवली-व्यवस्था', अशा बाबींना जाणिवपूर्वक उत्तेजन देत रहाते...त्यातूनच, शहर-उपनगरांमधून सार्वजनिक गणेशोत्सव-पूजा, दहीहंड्या, भंडारे, गरबे वगैरे निरर्थक, वेळखाऊ व खर्चिक गोष्टींना महाराष्ट्रात एकच ऊत आणला जाताना दिसतो. मौजमजा, कोडकौतुकाचे सोहळे म्हणून प्रमाणात या गोष्टी ठीक... पण, पोटाच्या, सन्मानाने जगण्याच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष व्हावं व त्यांचं शोषण-फसवणूक करता यावी, म्हणूनच जर 'भांडवली-व्यवस्थे'करवी ही अफुची मात्रा, बहुजन-समाजाला पाजली जात असेल तर...???

*...राजन राजे*

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०